

**दीपोत्सव**

पनवेल : दीपावलीनिमित्त वडाळे तलाव येथे स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाचा ७५ आकडा दिव्यांनी उजळवून दीपोत्सव साजरा करण्यात आला.

(छाया : केदार कोशे)


रविवार, २३ ऑक्टोबर २०२२

# रामप्रहर

◆ वर्ष १५ ◆ अंक ९६
www.ramprahar.com

◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड



शहरापासून जवळ सर्वात स्वस्त फ्लॅट्स
नवी मुंबई, पनवेल, नवीन ठाणे, वसई व पुणे
1RK ₹9* LAKH+ | 1BHK ₹16* LAKH+
INFRATECH
PRIME PLOTS & LAND EXPERTS
022 6808 3333
www.infratech.ind.in


## पनवेलमध्ये आज दिवाळी पहाट सांगीतिक कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि अखिल भारतीय नाट्य परिषद पनवेल शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षीप्रमाणे यंदाही पनवेलमध्ये सुश्राव्य गाण्यांची सुरेल मैफिल असलेल्या 'दिवाळी पहाट'चे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम रविवारी (दि. २३) सकाळी ६ वाजता पनवेल शहरातील वडाळे तलाव येथे होणार आहे.



दरवर्षी संगीत रसिकांचा या कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत असतो. यंदा 'दिवाळी पहाट'चे सहावे वर्ष असून यामध्ये झी मराठी लिटिल चॅम्प फेम प्रथमेश लघाटे, मुग्धा वैशंपायन, शमिका भिडे तसेच सूर नवा ध्यास नवा स्पर्धक प्रणय पवार ही प्रसिद्ध गायक मंडळी सुश्राव्य गाण्यांची मैफिल सादर करणार आहेत, तर या कार्यक्रमाचे निवेदन प्रसिद्ध निवेदिका धनश्री दामले करतील.

कार्यक्रमासाठी प्रवेश निःशुल्क असून या सुरेल मैफलीचा संगीत रसिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे उपाध्यक्ष व पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी केले आहे.

# सिडको वसाहतींमधील पाणीपुरवठ्याबाबत ठोस व ठराविक मुदतीत उपाययोजना करा

## अन्यथा आंदोलन करणार : आमदार प्रशांत ठाकूर




(छाया : विकास म्हात्रे)

**पनवेल : प्रतिनिधी**

सिडको वसाहतींमधील पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सुटावा यासाठी ठोस उपाययोजना ठराविक मुदतीत कराव्यात; अन्यथा आम्ही आंदोलन करू, असा इशारा भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी शुक्रवारी (दि. २१) सिडकोच्या बैठकीत दिला. दिवाळीत गरज असेल तिथे सिडकोने टँकरद्वारे मोफत पाणीपुरवठा करावा, अशी मागणीही त्यांनी या वेळी केली.

पनवेल महापालिका हद्दीतील सिडको वसाहतींमध्ये कमी पाणीपुरवठा होत असल्याच्या तक्रारी येत आहेत. त्या अनुषंगाने आमदार प्रशांत ठाकूर यांनी शुक्रवारी सिडको भवनमध्ये मुख्य अभियंता राजेंद्र धायकर, अधीक्षक अभियंता मूळ, कार्यकारी अभियंता चौथाणी यांच्याबरोबर बैठक घेतली. या बैठकीस माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी नगरसेवक प्रकाश बिनेदार, अ‍ॅड. मनोज भुजबळ, तेजस कांडपिळे, संतोष शेट्टी, डॉ. अरुणकुमार भगत, निलेश बावीस्कर, समीर ठाकूर, एकनाथ गायकवाड, माजी नगरसेविका चारुशीला घरत, राजश्री वावेकर, भाजप शहर अध्यक्ष जयंत पगडे उपस्थित होते.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, सिडको वसाहतींमध्ये सतत पाण्याचा तुटवडा भासत असल्याने त्यावर कायमस्वरूपी उपाययोजना करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व सिडको सतत वेगवेगळी कारणे देत असते. आता ते थांबवा. तुमच्या अडचणी तुम्ही सोडवा, पण नागरिकांना पुरेसे पाणी द्या. त्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करा. पाणीवाटप स्वयंचलित पद्धतीने करा. ज्या प्रभागातील पाण्याच्या टाक्या पाडून टाकल्या आहेत त्या प्राधान्याने बांधा. पाइपलाइन बदलायची असेल किंवा विद्युतपुरवठ्यासंबंधी अडचणी असतील तर त्या ठराविक वेळेत पूर्ण करा व कधी पूर्ण करणार त्याची प्रेसनोट काढून पत्रकारांना द्यावी. अन्यथा आम्हाला आंदोलन करावे लागेल. **(पान २ वर..)**

(छाया : लक्ष्मण ठाकूर)



## 'रामप्रहर'ने दिवाळी अंकांची परंपरा जपली –लोकनेते रामशेठ ठाकूर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दै. रामप्रहरच्या वतीने दरवर्षी दीपावलीनिमित्त विशेषांक प्रसिद्ध करण्यात येतो. अगदी कोरोना काळातही त्यात खंड पडला नाही. 'रामप्रहर'ने दिवाळी अंकांची परंपरा जपली असून यंदा पर्यटनावर आधारित दिवाळी अंकातून वाचकांना पर्यटनाची पर्वणी दिली आहे, असे गौरवोद्गार माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शनिवारी (दि. २२) येथे काढले.

'रामप्रहर'च्या पर्यटन विशेष भटकंती दिवाळी अंकाचे प्रकाशन लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते आणि भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर व माजी महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत त्यांच्या निवासस्थानी करण्यात आले. त्या वेळी ते बोलत होते.

प्रकाशन समारंभास 'रामप्रहर'चे मुख्य संपादक देवदास मटाले, वृत्त संपादक समाधान पाटील, ज्येष्ठ पत्रकार दीपक म्हात्रे, संजय कदम, भाजप नेते गजानन पाटील, प्रकाश पाटील, मल्हार चॅनेलचे संपादक नितीन कोळी, प्रवीण मोहोकर, आर्टिस्ट सुबोध ठाकूर, पंकज डावलेकर, अक्षय शार्दूल आदी उपस्थित होते.

'रामप्रहर'ने दिवाळी अंकात निसर्ग आणि प्रवासवर्णन यांची चांगली सांगड घातली आहे. मुखपृष्ठही सुंदर आहे. या अंकात रायगडसह महाराष्ट्रातील तसेच देश-विदेशातील पर्यटनावर दृष्टिक्षेप टाकण्यात आला आहे. त्याचप्रमाणे या माध्यमातून स्थानिकांना रोजगार कसा उपलब्ध होईल याकडेही लक्ष वेधण्यात आले आहे. याशिवाय कथा, कविता, व्यंगचित्रे यांचाही समावेश आहे. त्यामुळे हा सर्वांगसुंदर अंक सर्वांना आवडेल अशी खात्री वाटते, असे लोकनेते रामशेठ ठाकूर म्हणाले. **(पान २ वर..)**

## नेरळ-माथेरानदरम्यान पुन्हा धावली मिनीट्रेन!



(छाया : विजय मांडे)

**कर्जत : प्रतिनिधी**

पर्यटनाचा दिवाळी हंगाम सुरू होण्यापूर्वी नेरळ-माथेरान मिनीट्रेन शनिवारी (दि. २२) तब्बल सव्वातीन वर्षांनंतर धावली. माथेरान स्थानकात या गाडीचे माथेरानकरांनी जल्लोषात स्वागत केले.

२०१९मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे नेरळ ते माथेरानदरम्यानच्या डोंगर भागातून जाणाऱ्या मिनीट्रेनच्या रूळांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. पावसामुळे खाडीसह रूळही वाहून गेले होते. त्यामुळे सुरक्षेच्या कारणास्तव नेरळ ते माथेरान मिनीट्रेनची सेवा बंद करण्यात आली होती. स्थानिकांच्या सोयीसाठी अमन लॉज ते माथेरानदरम्यान शटल सेवा चालविण्यात येत होती.

नेरळ-माथेरान मिनीट्रेन बंद असल्याने येथे येणारे पर्यटक नाराजी दर्शवित असत. अखेर मध्य रेल्वे विभागाने ही ट्रेन सुरू करण्यासाठी पुढाकार घेतला आणि या मार्गावरील कामे युद्धपातळीवर करण्यात आली. त्यानंतर शनिवारपासून ही ट्रेन पर्यटकांच्या दिमतीस पुन्हा धावू लागली आहे.

**(सविस्तर वृत्त पान ५ वर..)**

## ७५ हजार तरुणांना शासकीय सेवेचे नियुक्तीपत्र



**नवी दिल्ली** : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते शनिवारी (दि. २२) देशातील ७५ हजार तरुणांना केंद्र सरकारच्या शासकीय सेवेचे नियुक्तीपत्र देण्यात आले. नागपूर येथील कार्यक्रमात यातील २०० नवनियुक्त कर्मचाऱ्यांना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले. या वेळी पंतप्रधान मोदींनी नवनियुक्त कर्मचाऱ्यांशी ऑनलाइन पद्धतीने संवाददेखील साधला.

## आज भारत-पाक महामुकाबला रंगणार

**मेलबर्न** : भारत आणि पाकिस्तान या कट्टर पारंपरिक प्रतिस्पर्ध्यांमध्ये टी-२० क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत रविवारी (दि. २३) लढत होणार आहे. सुपर १२ फेरीसाठी उभय संघ थेट पात्र ठरले असून त्यांच्यातील सामन्याकडे क्रिकेटप्रेमींचे लक्ष लागले आहे.

## श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळातर्फे २२वी राज्य आणि जिल्हास्तरीय दिवाळी अंक स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा, सांस्कृतिक अशा विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने २२वी राज्यस्तरीय आणि रायगड जिल्हास्तरीय दिवाळी अंक स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. संपूर्ण महाराष्ट्रात नावाजलेल्या या दिवाळी अंक स्पर्धेच्या प्रवेश प्रक्रियेला सुरुवात झाली आहे.

**प्रवेश प्रक्रियेला सुरुवात; बक्षिसांच्या रकमेत भरघोस वाढ**

दिवाळी अंक ही महाराष्ट्रातील पूर्वापार चालत आलेली एक सांस्कृतिक परंपरा आहे. **(पान २ वर..)**







# डिझेल अनुदान थकबाकी वितरणाचे आदेश

## मंत्री सुधीर मुनगंटीवार यांचा मच्छीमार बांधवांना दिलासा

**मुंबई : प्रतिनिधी**

मच्छीमार सहकारी सोसायट्यांच्या सदस्यांना नावेच्या डिझेलवर देण्यात येणाऱ्या अनुदानाची थकबाकीची रक्कम वितरित करण्याचे आदेश शुक्रवारी (दि. २२) शासनाने जारी केले आहेत. त्यामुळे मच्छीमार बांधवांना दिलासा मिळाला आहे.



मत्स्यव्यवसायमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी या संदर्भातील सूचना विभागाला दिल्या होत्या. मच्छीमार सहकारी सोसायट्यांच्या सदस्यांना त्यांच्या नावेकरिता लागणाऱ्या डिझेलवरील कराची प्रतिपूर्ती अनुदानस्वरूपात केली जाते, मात्र गेल्या काही काळापासून हे अनुदान थकित असल्याबद्दल काही निवेदने मंत्री महोदयांना प्राप्त झाली होती. त्यावर कार्यवाही करीत मंत्री मुनगंटीवार यांनी विभागाला अनुदानाची थकबाकी लवकरात लवकर वितरित करावी अशा सूचना दिल्या. त्यानुसार शासनादेश जारी करण्यात आला असून थकबाकीचे वितरण सुरू करण्यात आले आहे.

अनुदानापोटी १८.३७ कोटींचा निधी मंजूर करण्यात आला असून प्रथम येणाऱ्यास प्राधान्य या तत्त्वावर या थकित निधीचे वितरण करण्यात येणार आहे. ऐन दीपावलीच्या दिवसात थकबाकीच्या वितरणाचे आदेश जारी झाल्यामुळे मच्छीमार बांधवांमधे आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# पळस्पे येथे एसटी बसचा अपघात

## आठ ते दहा प्रवासी जखमी; मोठा अनर्थ टळला

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुका हद्दीतील महामार्ग पोलीस केंद्र पळस्पेजवळ एका एसटी बसचा अपघात झाल्याने यात आठ ते दहा प्रवासी जखमी झाले आहेत.



(छाया : संजय कदम)

पनवेल तालुका हद्दीतील महामार्ग पोलीस केंद्र, पळस्पे चौकीजवळ महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाची ठाणे–सांगली बस (क्र. एमएच ४० एन ९१६४) कोन पुलावरून महामार्गावर जाणारा वळण घेत असताना चालकाचे बसवरील नियंत्रण सुटले आणि बस रस्त्यावरून खाली झाडांमध्ये पलटी झाली.

ही बस प्रवाशांनी भरली होती. दिवाळी सणासाठी चाकरमानी मुंबईहून गावी जाण्यासाठी या बसमधून तब्बल ४६ प्रवासी प्रवास करीत होते. अपघातानंतर सर्व प्रवासी बसमध्येच अडकून पडले होते.

महामार्ग पोलीस केंद्राला घटनेची माहिती मिळताच त्यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. बसच्या पाठीमागील काचा फोडून प्रवासी तसेच त्यांचे सामान बाहेर काढण्यात आले.

या अपघातात आठ ते दहा प्रवासी जखमी झाले आहेत, तसेच बसचालकदेखील गंभीर जखमी असून त्याच्या चेहऱ्याला दुखापत झाली आहे. जखमी प्रवाश्‍यांना उपचारासाठी आयआरबीच्या रुग्णवाहिकेतून कळंबोलीतील एमजीएम दवाखान्यात दाखल करण्यात आले. महामार्ग पोलिसांनी तत्काळ मदत करीत सर्व प्रवाशांना त्यांच्या सामानासह सुखरूप बाहेर काढले.

भांबावलेल्या प्रवाशांना आधार देण्याचे मोलाचे कार्य महामार्ग पोलिसांनी केले. प्रवाशांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करून त्यांना पर्यायी वाहनांचीदेखील व्यवस्था करून देण्यात आली. त्यामुळे प्रवाशांनी महामार्ग पोलिसांचे विशेष आभार मानले. बस झाडांमुळे अडल्याने मोठा अनर्थ टळला.

# शिवराज पाटील-चाकूरकरांनी जनतेची माफी मागावी

## भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांची पत्रकार परिषदेत मागणी

**मुंबई : प्रतिनिधी**

ज्येष्ठ काँग्रेस नेते आणि देशाचे माजी गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांनी गीतेतील श्रीकृष्णाचा अर्जुनाला संदेश म्हणजे जिहाद असल्याचे केलेले वक्तव्य अत्यंत दुःखदायक असून हिंदू समाज आणि देश कधीही हे विधान सहन करणार नाही.



त्यांनी देशाची आणि हिंदू धर्मियांची माफी मागितली पाहिजे, अशी मागणी भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी शुक्रवारी (दि. २१) मुंबईत भाजप प्रदेश कार्यालयात पत्रकारांशी बोलताना केली.

ते म्हणाले की, शिवराज पाटील चाकूरकर यांनी लोकसभा अध्यक्ष आणि देशाचे गृहमंत्री अशा मोठ्या पदांवर काम केले. त्या पदांचाही त्यांनी अपमान केला आहे. त्यांनी केलेले विधान हिंदू संस्कृती आणि भारताचा अपमान करणारे आहे. हे सहन केले जाणार नाही. त्यामुळे शिवराज पाटील यांना माफी मागावी लागेल.

आपल्या राज्यातील प्रवासात ठिकठिकाणी काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसचे चांगले कार्यकर्ते पंतप्रधान नरेंद्र मोदी व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेऊन भाजपमध्ये प्रवेश करत आहेत. त्यामुळे आपल्याविरोधात काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसने सुरू केलेले आंदोलन स्वाभाविक आहे, असा टोला त्यांनी लगावला.

# नवी मुंबईत बालनाट्य शिबिर

**नवी मुंबई : बातमीदार**

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद नवी मुंबई शाखा आणि संत शिरोमणी कलामंच व नवी मुंबई बाल रंगभूमी यांच्या संयुक्त विद्यमाने २८ ऑक्टोबर ते ७ नोव्हेंबर या दीपावली सुट्टीच्या कालावधीत बालनाट्य अभिनय शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. वाशीतील विष्णूदास भावे नाट्यगृहात तालीम हॉलमध्ये सायंकाळी ५ ते ७ या वेळेत हे शिबिर होणार आहे.




बालकलाकारांच्या सुप्त कलागुणांना योग्य संधी मिळावी आणि त्यातून चांगले कलाकार, नाट्यरसिक घडावेत, या उद्देशाने मागील २५ वर्षांपासून श्रीहरी पवळे यांनी बालनाट्य शिबिराची परंपरा सुरू ठेवली आहे. शिबिरात नवी मुंबईतील बालकलाकारांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन श्रीहरी पवळे यांनी केले आहे.

# ‘किल्ले रायगड’च्या दिवाळी अंकाचे प्रकाशन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दै. किल्ले रायगडच्या दिवाळी अंकाने सातत्याने साहित्यिक अभिरुची जपली आहे, असे प्रतिपादन भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी शनिवारी (दि. २२) येथे केले. पनवेल येथून प्रकाशित होणाऱ्या किल्ले रायगड वृत्तपत्राच्या ५६व्या दिवाळी अंकाचे प्रकाशन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. त्या वेळी ते बोलत होते.

या कार्यक्रमास पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, ‘किल्ले रायगड’चे संपादक प्रमोद वालेकर, जाहिरात व्यवस्थापक प्रदीप वालेकर, तुषार तटकरी, उमेश भोईर, सा. उरण समाचारच्या उपसंपादक दीपिका पाटील आदी उपस्थित होते.



माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी, दैनिक किल्ले रायगड विश्वासाहर्ता व लोकाभिमुख असे दैनिक आहे. सुंदर लेख व इतर साहित्याचा भांडार असलेला त्यांचा दिवाळी अंक नेहमीच वाचनीय असतो. त्यामुळे किल्ले रायगडचे वाचक मोठ्या प्रमाणात आहेत, असे सांगितले.

या वेळी संपादक प्रमोद वालेकर यांनी सांगितले की, दै. किल्ले रायगडला प्रदीर्घ समृद्ध परंपरा लाभली आहे. या परंपरेला साजेल, असा सर्वांगसुंदर दिवाळी अंक प्रकाशित करण्याचा नेहमीच प्रयत्न असतो. त्या अनुषंगाने या वर्षीही महाराष्ट्रातील नामवंत आणि नवोदित साहित्यिकांच्या साहित्याचा या दिवाळी अंकात समावेश करण्यात आला आहे.

# वामन हरी पेठे सन्सचे अध्यक्ष सुबोध पेठे यांना राष्ट्रीय बौद्धिक संपदा पुरस्कार

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

वामन हरी पेठे सन्सचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक सुबोध सुहास पेठे यांना राष्ट्रीय बौद्धिक संपदा पुरस्कार प्रदान करण्यात आला. सुबोध सुहास पेठे हे पेठे कुटुंबातील तिसऱ्या पिढीतील उद्योजक आहेत.



नावीन्यतेची कास धरीत संरेखित आणि पारंपरिक भारतीय आचारसंहितेमध्ये रुजलेल्या गोष्टींना सतत आव्हान ते देत आले आहेत. सुबोध पेठे यांनी सोन्याचे दागिने निर्मिती प्रक्रियेचे पुनर्मूल्यांकन करण्यात खोलवर अभ्यास केला.

अनेक प्रयोग करून, ते वरील प्रश्नांची उत्तरे देणारे तंत्रज्ञान विकसित करण्यात यशस्वी झाले आहेत. आता कमी वजनात सोन्याचे दागिने बनवण्याच्या पद्धतीचे पेटंट त्यांनी मिळवले आहे. त्यामुळेच भारत सरकार, पेटंट, डिझाइन्स आणि ट्रेड मार्क्सचे नियंत्रक जनरल कार्यालय नॅशनल आयपी अवॉर्ड्स २०२१-२०२२ने त्यांना राष्ट्रीय आयपी परिषदेत वाणिज्य आणि उद्योगमंत्री पीयूष गोयल यांच्या हस्ते सुबोध पेठे यांना सन्मानित करण्यात आले आहे.



**पनवेल : उरण येथून प्रकाशित होणाऱ्या सा. उरण समाचार या वृत्तपत्राच्या दिवाळी अंकाचे प्रकाशन भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर आणि महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते शनिवारी करण्यात आले. या वेळी ‘उरण समाचार’च्या उपसंपादिका दीपिका पाटील, कार्यकारी संपादक आशिष पाटील, उपकार्यकारी संपादक अमोल पाटील, प्रतिनिधी साईराज माळी आदी उपस्थित होते.**

पान १ वरून

## सिडको वसाहतींमधील पाणीपुरवठ्याबाबत ठोस व ठराविक मुदतीत उपाययोजना करा

दिवाळी असल्याने आता कोठेही पाणी कमी पडू देऊ नका. ज्या भागात पाणी मिळत नसेल तेथील नागरिकांना तातडीने टँकरद्वारे मोफत पाणीपुरवठा करण्याची मागणीही या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी केली.

सिडकोचे मुख्य अभियंता राजेंद्र धायकर यांनी, पाडलेल्या पाण्याच्या टाक्यांचे काम लवकरच सुरू होणार असून इतरही कामांच्या टेंडरची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती दिली. या वेळी अनेक माजी नगरसेवकांनी तुमच्याकडे पुरेसे पाणी नसल्याने तुम्ही बिल्डरना ओसीसाठी ना हरकत दाखला देऊ नका. त्यामुळे पाण्याची मागणी वाढत असून त्याचा परिणाम एकूण पाणीपुरवठ्यावर होत असल्याचे निदर्शनास आणले.

## ‘रामप्रहर’ने दिवाळी अंकांची परंपरा जपली -लोकनेते रामशेठ ठाकूर

दिवाळी अंकातील माणुसकी या कवितेचा संदर्भ देत लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सांगितले की, माणसाला जगण्यासाठी अन्न, वस्त्र, निवारा आवश्यक असतो. त्याचबरोबर माणुसकीही महत्त्वाची आहे.

आमदार प्रशांत ठाकूर आणि माजी महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर यांनीही ‘रामप्रहर’च्या अंकाचे कौतुक करून सर्वांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या.

‘रामप्रहर’च्या दिवाळी अंकासाठी व्यवस्थापक दादाराम मिसाळ, उपसंपादक वसंत ठाकूर, तन्वी गायकवाड, सायली रावले, लेखापाल उद्धव घरत, वितरक महेश काळे, मुख्य आर्टिस्ट अरुण चवरकर, शशिकांत बारसिंग, प्रवीण गायकर, मुद्रित शोधक दिलीप रेडकर, किल्लेप्रेमी पैगंबर शेख, छायाचित्रकार सुधीर नाझरे, कार्यालयीन सहाय्यक सुरज पाटील, किरण वाहुळकर यांचेही सहकार्य लाभले.

## श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळातर्फे २२वी राज्य आणि जिल्हास्तरीय दिवाळी अंक स्पर्धा

ही परंपरा अखंडपणे चालू राहावी व त्यातून दर्जेदार दिवाळी अंकांची निमिर्ती व्हावी यासाठी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणारे श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि मुंबई मराठी पत्रकार संघ यांच्या वतीने गेल्या २१ वर्षांपासून महाराष्ट्रातील सर्वांत मोठ्या दिवाळी अंक स्पर्धेचे आयोजन करण्यात येत असून यंदाची ही २२वी स्पर्धा आहे. नेहमीप्रमाणे यंदाही बक्षिसांच्या रकमेत वाढ करण्यात आली आहे. त्यानुसार राज्यस्तरीय दिवाळी अंक स्पर्धेमधील विजेत्या प्रथम क्रमाकांस एक लाख रुपये, व्दितीय क्रमाकांस ५० हजार रुपये, तर तृतीय क्रमाकांस ३० हजार रुपये तसेच आकर्षक सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. त्याचबरोबर या स्पर्धेतील उत्कृष्ट कथेसाठी सात हजार रुपये, उत्कृष्ट कविता, उत्कृष्ट व्यंगचित्र, उत्कृष्ट विशेषांक व उत्कृष्ट मुखपृष्ठ यांना प्रत्येकी पाच हजार रुपये, बालसाहित्याच्या सर्वोत्कृष्ट अंकास ७५०० रुपये तसेच रायगड जिल्ह्यातून प्रकाशित होणाऱ्या दिवाळी अंकांसाठी खास पारितोषिके देण्यात येणार असून यामध्ये प्रथम क्रमांकास ४० हजार रुपये, व्दितीय क्रमांकास २० हजार रुपये आणि तृतीय क्रमाकांस १० हजार रुपये, दोन उत्तेजनार्थ प्रत्येकी पाच हजार रुपये आणि सर्व पुरस्कारप्राप्त अंकांना सन्मानचिन्ह असे बक्षिसांचे स्वरूप आहे.

दरवर्षीप्रमाणे यंदाही या स्पर्धेत स्पर्धकांनी मोठ्या संख्येने सहभाग घ्यावा, असे आवाहन श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, संयोजक दीपक म्हात्रे यांनी केले आहे. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी दिवाळी अंकाच्या दोन प्रती १०० रुपये प्रवेश फीसह २० नोव्हेंबरपर्यंत पाठवाव्यात. दिवाळी अंक पाठविण्यासाठी व अधिक माहितीसाठी श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, प्लॉट क्रमांक ४७५, मार्केट यार्ड, पनवेल, जि. रायगड येथे अनिल कोळी (९७६९४०९१६१) यांच्याशी संपर्क साधावा, असे कळविण्यात आले आहे.

# सुनील गोवारी यांचा समर्थकांसह बाळासाहेबांच्या शिवसेनेत प्रवेश

**पनवेल : वार्ताहर**

कामोठे विभागातील सुनील गोवारी यांनी त्यांच्या समर्थकांच्यासह बाळासाहेबांच्या शिवसेनेत जाहीर प्रवेश केला.

दीपावलीच्या मुहूर्तावर वर्षा निवासस्थानी शनिवारी (दि. २२) मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत गोवारी यांनी पक्षप्रवेश केला. या वेळी महानगर प्रमुख प्रथमेश सोमण व तालुकाप्रमुख रुपेश ठोंबरे उपस्थित होते.




या वेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सुनील गोवारी यांची कामोठे शहर प्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली.

## दुखवटा

### बी. ए. शेख

**पनवेल :** रयत शिक्षण संस्थेचे माजी मुख्याध्यापक बी. ए. शेख काही दिवसांपासून आजारी होते. उपचार सुरू असतानाच त्यांचे बुधवारी (दि. १९) निधन झाले. त्यांचे वय ७८ वर्षे होते. बी. ए. शेख हे रयत शिक्षण संस्थेत शिक्षक व मुख्याध्यापक



अशी प्रदीर्घ सेवा करून २००२मध्ये सेवानिवृत्त झाले होते. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, सून, मुलगी, जावई, नात व नातू असा परिवार आहे.

# करंजा-रेवस रस्ते मार्गाने जोडणार

## २०२५पर्यंत रस्ता होणार तयार / ४० वर्षांची प्रतीक्षा संपली



**उरण : प्रतिनिधी**

४० वर्षांपूर्वी उरण व अलिबाग या दोन तालुक्यांना जोडणाऱ्या रेवस करंजा खाडी पुलाचा प्रस्ताव तयार करण्यात आला होता. या प्रस्तावाला शासनाची आता मंजुरी मिळाली असून २०२५पर्यंत तो पूर्ण करण्यात येणार आहे. त्यामुळे रेवस व करंजा ही दोन्ही बंदरे रस्ते मार्गाने जोडली जाणार आहेत. या पुलाचे स्वप्न साकार होत असल्याने उरण व अलिबागमधील दोन्ही तालुक्यातील नागरिकांनी आनंद व्यक्त केला आहे.

अलिबाग तालुक्यातील रेवस ते उरणचे करंजा बंदर हे दोन किलोमीटरचे खाडीचे अंतर असून या खाडीवर पूल उभारण्याचा प्रस्ताव १९८०मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री बॅ. ए. र. अंतुले यांनी केला होता, मात्र त्याची मागील ४० वर्षांत अंमलबजावणी होऊ शकली नाही. याकरीता उरणमध्ये करंजा रेवस प्रकल्पासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने दोन इमारती उभारल्या होत्या, त्याही जीर्ण झाल्याने धोकादायक बनल्या असल्याने वापरा साठी बंदी घालण्यात आली आहे. या पुलाचा प्रस्ताव मंजूर झाला आहे.त्याची निविदा ही प्रसिद्ध झाली असून २०२५पर्यंत हा पूल पूर्ण होणार आहे. त्यामुळे अनेक वर्षांपासून धोकादायक जलप्रवासावर अवलंबून असलेल्या उरण व अलिबाग या दोन्ही तालुक्यातील नागरिकांना रस्ते मार्गाने प्रवास करता येणार आहे.



### पर्यटकांचा प्रवास सुखकर होणार

*रेवस व करंजा या दोन्ही बंदरांना जोडणाऱ्या पुलामुळे अलिबाग, मुरूड तसेच कोकणात पर्यटनासाठी जाणाऱ्या पर्यटकांना मुंबई, पनवेल, पेण, अलिबाग असा वळसा न घालता थेट नवी मुंबईतून उरणच्या करंजा येथून अलिबाग गाठता येणार आहे. त्यामुळे प्रवासासाठी लागणार वेळ,इंधन आणि जादाचे पैसे ही वाचण्यास मदत होणार आहे, तसेच प्रवासही वेगाने होणार आहे.*

### रो रो सेवादेखील लवकरच सुरू

*रेवस-करंजा खाडी पूल मंजूर झाला आहे. याच मार्गावरील जलमार्गावर रो रोची तयारी सुरू असून यातील करंजा जेट्टीचे काम पूर्ण झाले आहे, तर रेवस जेट्टीचे काम सुरू आहे. येत्या काही महिन्यांतच या मार्गावरील ही सेवा सुरु होणार असल्याने नागरिकांना दोन पर्याय उपलब्ध होणार आहेत.*



पनवेल : भाजप महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील यांनी रमा एकादशी गोवत्स द्वादशी वसुबारसनिमित्त गोमाता पूजनाचे आयोजन विक्रांत पाटील जनसेवा कार्यालय येथे शुक्रवारी करण्यात आले. या वेळी मोहिनी विक्रांत पाटील, राजश्री देसाई, शर्वरी निकम, वसुधा सोलंकी, तृप्ती पांडे, माधुरी गवाहाणे, वृषाली थोरात, अमृता यादव, स्वाती पवार व प्रभागातील अनेक माता-भगिनी उपस्थित होत्या.






पनवेल : दिवाळीनिमित्त भाजप कार्यकर्ते मुक्ता खटावकर, भानूदास खटावकर, सौरभ भारती, गौरव खाटेकर यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची निवासस्थानी भेट घेत आशीर्वाद घेतले. या वेळी महापालिका माजी सभागृह नेते परेश ठाकूर उपस्थित होते. सर्वांनी एकमेकांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या. (छाया : चेतन पोपेटा)



कळंबोली : सुधागड शाळेच्या मैदानावर रामदास शेवाळे प्रतिष्ठान आणि 'सकाळ'तर्फे प्रसिद्ध गायक कृष्णा बोंगाणे यांच्या सुरेल गीतसंध्या हा कार्यक्रम शुक्रवारी सायंकाळी झाला. या स्वरमैफिलीत भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी सहभागी होत नागरिकांना दीपावलीच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमात सिनेअभिनेत्री गौरी नलावडे, भाग्यश्री मिलिंद, शीतल क्षीरसागर अभिनेते आदिनाथ कोठारे, माधव अभ्यंकर आदी कलाकार सहभागी झाले होते. या वेळी बाळासाहेबांची शिवसेना पक्षाचे सचिव संजय मोरे, उपजिल्हाप्रमुख परेश पाटील, पनवेल तालुका प्रमुख रुपेश ठोंबरे आदी उपस्थित होते.

## ॐ श्री साईराम पदयात्रा मंडळातर्फे साई भंडारा उत्साहात



**उरण : बातमीदार**

दरवर्षीप्रमाणे यंदाही उरण तालुक्यातील ॐ श्री साईराम पदयात्रा मंडळातर्फे उरण ते शिर्डी पदयात्रेचे आयोजन करण्यात आले होते. ही पदयात्रा उरणला परतल्यानंतर गुरुवारी (दि. २०) साई मंदिर, अंबिकावाडी येथे श्री सत्यनारायण महापूजा तसेच साई भंडाराचे आयोजन केले करण्यात आले होते.

या वेळी मोठ्या संख्येने भाविकांनी दर्शनाचा व महाप्रसादाचा लाभ घेतला. पदयात्रा, सत्यनारायण महापूजा, साई भंडारा व इतर सर्व कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ॐ श्री साईराम पदयात्रा मंडळाचे अध्यक्ष संदीप ठाकूर,सेक्रेटरी विजय घरत,हरिभाऊ नाईक, जनार्दन घरत (सल्लागार) यांच्यासह मंडळाचे पदाधिकारी सदस्यांनी विशेष मेहनत घेतली.

## नियमांचे उल्लंघन करणाऱ्या मिठाई विक्रेत्यांवर नजर

### दिवाळीपूर्वी १४ जणांवर कारवाई; दोघांकडून दंड वसूल

**पनवेल : वार्ताहर**

दिवाळीत स्वीट मार्टवर खरेदी वाढते. मिठाईच्या दुकानात प्रत्येक मिठाईवर बेस्ट बिफोरचा बोर्ड असणे आवश्यक आहे. असे नसल्यास मिठाईचा साठा जप्त करण्यात येतो. अन्न व औषध प्रशासनाने त्यादृष्टीने कारवाई सुरू केली आहे. याप्रकरणी अन्न औषध प्रशासनाने दिवाळीपूर्वी पनवेलमधील १४ जणांवर कारवाई केली आहे. यापैकी दोघांकडून दंडदेखील वसूल करण्यात आला आहे.

ग्राहकांना चांगल्या दर्जाची उत्पादने मिळावीत यासाठी मिठाईचा टिकाऊपणा ग्राहकांना सांगणे बंधनकारक करण्यात आले आहे. फूड सेफ्टी अँड स्टॅण्डर्ड अथोरिटी ऑफ इंडियाने (एफएसएसआयए) त्याबाबतचे आदेश दिले आहेत. त्यामुळे मिठाई पदार्थाचा ताजेपणाचा कालावधी अर्थात 'बेस्ट बिफोर' तारीख नमूद करणे दुकानदारांना बंधनकारक असल्याने हि तारीख पाहूनच खरेदीदारांनी मिठाई घ्यावी. याप्रकरणी अन्न औषध प्रशासनाने दिवाळीपूर्वी १४ जणांवर कारवाई केली आहे. यापैकी दोघांकडून दंड देखील वसूल करण्यात आला आहे.

पनवेलमध्ये मिठाईची तब्बल ३०० दुकाने आहेत. रायगड जिल्ह्यासाठी अन्न औषध प्रशासनाचे केवळ चार अधिकारी कार्यरत आहेत.

यापैकी एक अधिकारी रजेवर असल्याने तीन अधिकाऱ्यांची चांगलीच तारांबळ उडताना दिसून येते, मात्र तरीदेखील प्रशासन आपले काम चोख करीत आहे.

**प्रशासनाने नियमांचे पालन न करणाऱ्या मिठाई विक्रेत्यांवर कारवाई सुरु केली आहे. १४ जणांवर ही कारवाई करण्यात आली आहे.यामध्ये दोन जण दोषी आढळल्याने २१ हजारांचा दंड वसूल करण्यात आला आहे. ही मोहीम अशीच सुरू राहणार आहे.**

**-एल. के. दराडे, उपायुक्त,**
**अन्न औषध प्रशासन, रायगड**

## नवीन पनवेल येथे कविसंमेलन रंगले



**पनवेल : वार्ताहर**

जाई फाउंडेशनतर्फे संचलित शब्दवेल साहित्य मंच मुंबईद्वारे आयोजित 'सर्जनशीलतेचा नवाविष्कार' दिवाळी अंकाचा प्रकाशन सोहळा व निमंत्रितांचे कविसंमेलन नवीन पनवेल येथे झाले.या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्रा. एल. बी. पाटील तर उद्घाटक म्हणून लेखक व चित्रकार प्रदीप म्हापसेकर, कार्याध्यक्ष डॉ. वर्षा रणदिवे उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून प्रमुख राज्यकर उपायुक्त अंजली ढमाळ तर मार्गदर्शक म्हणून ज्येष्ठ साहित्यिक प्रतिभा सराफ, युवा कादंबरीकार तथा महाराष्ट्र साहित्य संस्कृती मंडळाचे सदस्य पुष्पराज गावंडे तर प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ पत्रकार गणेश कोळी, कोमसाप केंद्रिय कार्यकारिणीचे रमेश भोळे यांच्या उपस्थितीत पार पडले. प्रकाशन सोहळ्यानंतर दोन सत्रामध्ये निमंत्रितांच्या कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. पहिल्या कविसंमेलनाच्या पहिल्या सत्राचे अध्यक्ष म्हणून ज्येष्ठ साहित्यिक विजय बिंदोड, तर प्रमुख अतिथी म्हणून जितेंद्र लाड, माणिकराव गोडसे व जयश्री चौधरी उपस्थित होते. मंदाकिनी पाटील यांच्या अध्यक्षतेखाली कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले राज्यभरातून सुमारे ७० कवी या कविसंमेलनासाठी निमंत्रित करण्यात आलेले होते.

## प्रो. कृष्णा सावंत यांना उर्दू साहित्यातील पदव्युत्तर पदवी प्रदान



**रसायनी : प्रतिनिधी**

नवीन पनवेल येथील प्रो. कृष्णा आर. सावंत यांनी मुंबई विद्यापीठातून उर्दू साहित्यातील पदव्युत्तर पदवी प्रथम श्रेणीत यशस्वीरित्या उत्तीर्ण केली.

प्रा. कृष्णा आर सावंत या मॅनेजमेंट प्रॅक्टिशनर म्हणून वित्त, माध्यम आणि सेवा उद्योगात २५ वर्षांपेक्षा जास्त व्यावसायिक उत्कृष्टता असलेले एक कुशल व्यवस्थापन अभ्यासक आहेत. सध्या त्या पिल्लेस इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड रिसर्च न्यू पनवेल येथे मॅनेजमेंट हा विषय शिकवतात. प्रा. कृष्णा आर सावंत एक व्यावसायिक स्वतंत्र दुभाषी आणि पर्शियन आणि उर्दू भाषेसाठी अनुवादक देखील आहेत. त्या मुंबई विद्यापीठाच्या उर्दू विभाग, उर्दू फारसी अकादमी आणि उर्दू तेहजीब लॅबशी संबंधित आहे. त्या हिंदी आणि उर्दूमध्ये कवयित्री आणि शायरादेखील आहेत.

## 'रोटरी'तर्फे आदिवासीवाडीत फराळवाटप



**रसायनी : प्रतिनिधी**

रोटरी क्लब ऑफ पाताळगंगातर्फे शुक्रवारी (दि. २१) वडगाव, वाशिवली व आंबेमाळ आदिवासीवाडी येथे २०० हून अधिक कुटुंबियांना दिवाळी फराळवाटप करण्यात आले. या वेळी रोटरी क्लब ऑफ पाताळगंगाचे अध्यक्ष अमित शाह, फर्स्ट लेडी मित्तल शाह, क्लब सेक्रेटरी डॉ. धीरज जैन, माजी अध्यक्ष बाळकृष्ण होणावळे, शानबाग, मेघा कोरडे, जयश्री पाटील, वनवासी कल्याण आश्रमच्या सुचेता जोशी, राजश्री कुलकर्णी, पिल्लाई कॉलेजचे विद्यार्थीदेखील उपस्थित होते.

विशेष म्हणजे वडगाववाडी येथे क्लब सेक्रेटरी डॉ. धीरज जैन यांनी तेथील लोकांची आरोग्य तपासणी करून त्यांना औषधेदेखील देण्यात आली.

## जागतिक संशोधकांच्या यादीत डॉ. गिरीश गुंड यांचा समावेश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल येथील रयत शिक्षण संस्थेच्या महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील भौतिकशास्त्र विभागातील सहाय्यक प्राध्यापक डॉ. गिरीश गुंड यांना स्टॅनफोर्ड विद्यापीठाने जाहीर केलेल्या जगभरातील आघाडीच्या दोन टक्के संशोधकांच्या यादीमध्ये मानांकन प्राप्त झाले आहे. त्यासोबतच कोरियन इंटेलेक्चुअल प्रॉपर्टी एजन्सीकडून त्यांच्या चार पेटेंटना मंजुरी मिळाली आहे. त्यातील तीन पेटेंटना अनुदानही प्राप्त झाले आहे. पनवेल महाविद्यालयाच्या शैक्षणिक घोडदौडीतील ही अतुलनीय घटना असल्याचे सुतोवाच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर यांनी केले आहे. त्यांच्या या यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन डॉ. अनिल पाटील, संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य व महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन मी खासदार रामशेठ ठाकूर, सचिव प्राचार्य डॉ. विठ्ठल शिवणकर, सहसचिव डॉ. शिवलिंगमेन कुदळे यांनी अभिनंदन केले.



उपलब्ध पुराव्यांनुसार दिवाळी हा सण किमान तीन हजार वर्षे जुना आहे. प्राचीन काळी हा यक्षांचा उत्सव मानला जायचा. अंधार दूर करून प्रकाश निर्माण करणारा दीप मांगल्याचे प्रतीक मानला जातो. त्याच्या प्रकाशाने आपल्या जीवनातील अंधकार दूर व्हावा म्हणून हा दीपोत्सव साजरा केला जातो. या दिवसांत दारात रांगोळ्या काढून पणत्या लावतात, घरांच्या दारात आकाशदिवे लावले जातात. महाराष्ट्रात व इतर ठिकाणी लहान मुले या काळात मातीचा किल्ला तयार करतात.

दिवाळी या सणाला दीपावली असेदेखील म्हटले जाते. दीपावली या शब्दाची उत्पत्ती संस्कृतमधील दोन शब्दांच्या उच्चाराने झाली. दीप म्हणजे दिवा आणि आवली म्हणजेच ओळ. याचा संपूर्ण अर्थ पाहिला तर दिव्यांची एका ओळीत केलेली रचना अर्थात दिवाळी. काही जण दिपवाळी असेदेखील म्हणतात, पण शुद्ध शब्द हा दीपावली आहे. वेगवेगळ्या शब्द प्रयोगानुसार त्याचा उच्चार बदलतो, पण अर्थ एकच आहे.

**वसुबारस पूजा**

आश्विन कृष्ण द्वादशीस म्हणजेच गोवत्सद्वादशीस, वसुबारस हा सण साजरा केला जातो. वसुबारस याचा अर्थ–वसु म्हणजे द्रव्य (धन) त्यासाठी असलेली बारस म्हणजे द्वादशी. या दिवसाला गोवत्स द्वादशी असेही म्हणतात. भारताची संस्कृती कृषिप्रधान असल्याने या दिवसाचे महत्त्व विशेष आहे. या दिवशी संध्याकाळी गाईची पाडसासह पूजा करतात. घरात लक्ष्मीचे आगमन व्हावे या हेतूनेही या दिवशी सवत्स धेनूची पूजा करण्याची पद्धत आहे. ज्यांच्याकडे घरी गुरे, वासरे आहेत त्यांच्याकडे या दिवशी पुरणाचा स्वयंपाक करतात. घरातील सवाष्ण बायका गाईच्या पायावर पाणी घालतात. नंतर हळद–कुंकू, फुले, अक्षता वाहून फुलांची माळ त्यांच्या गळ्यात घालतात. निरांजनाने ओवाळून केळीच्या पानावर पुरणपोळी वगैरे पदार्थ वाढून गाईला खाऊ घालतात. या दिवसापासून अंगणात रांगोळी काढण्यास सुरुवात होते. पुष्कळ स्त्रियांचा या दिवशी उपवास असतो. या दिवशी गहू, मूग खात नाहीत. स्त्रिया बाजरीची भाकरी व गवारीच्या शेंगांची भाजी खाऊन उपवास सोडतात. आपल्या मुला–बाळांना चांगले आरोग्य मिळावे व सुख लाभावे म्हणून ही पूजा असते.

**धनत्रयोदशी**

आश्विन कृष्ण त्रयोदशीस धनत्रयोदशी हा सण साजरा केला जातो. आयुर्वेदाच्या दृष्टीने हा दिवस धन्वंतरी जयंतीचा आहे. वैद्य मंडळी या दिवशी धन्वंतरीची (देवांचा वैद्य) पूजा करतात. लोकांस प्रसाद म्हणून कडुनिंबाच्या पानांचे बारीक केलेले तुकडे व साखर असे लोकांना देतात. (याला तेलुगूमध्ये गुडोदकम् म्हणतात.) यात मोठा अर्थ आहे. धन्वंतरी हा अमृतत्त्व देणारा आहे हे त्यातून प्रतीत होते. कडुनिंबाची पाच–सहा पाने जर रोज खाल्ली तर व्याधी होण्याचा संभव नाही, असे काहीजणांची समजूत आहे. कडुनिंबाचे एवढे महत्त्व आहे. म्हणून या दिवशी तोच धन्वंतरीचा प्रसाद म्हणून देण्यात येतो.

या दिवशी वस्त्रालंकार खरेदी करणे शुभ मानतात. उपवास करून घरातले द्रव्य व अलंकार पेटीतून काढून ते साफसूफ करतात. कुबेर, विष्णू–लक्ष्मी, योगिनी, गणेश, नाग आणि द्रव्यनिधी यांची पूजा करून पायसाचा नैवेद्य दाखवितात.

जैनधर्मीय या दिवसाला 'धन्य तेरस' वा 'ध्यान तेरस' म्हणतात. भगवान महावीर या दिवशी तिसऱ्या व चौथ्या ध्यानात जाण्यासाठी योगनिद्रेत गेले होते. तीन दिवसांच्या योगनिद्रेनंतर त्यांना दिवाळीच्या दिवशी निर्वाणप्राप्ती झाली. तेव्हापासून हा दिवस धन्य तेरस या नावाने प्रसिद्ध झाला.

**नरक चतुर्दशी**

नरक चतुर्दशी या सणाशी संबंधित नरकासुरवधाची आख्यायिका प्रचलित आहे. या दिवशी कृष्णाने नरकासुराचा वध करून प्रजेला त्याच्या जुलुमी राजवटीतून सोडवले. नरकासुराने तप करून ब्रह्मदेवाला प्रसन्न करून घेतले व अवध्यत्वाचा म्हणजेच कुणाकडूनही वध होणार नाही असा वर मागून घेतला. त्या वराच्या योगाने त्याने अनेक राजांना हरवून त्यांच्या कन्या व त्या राज्यांतील स्त्रियांचे अपहरण केले. नरकासुराने अशा एकूण १६,१०० स्त्रियांना पळवून नेले व मणिपर्वतावर एक नगर वसवून त्यात त्यांना बंदी बनवून ठेवले. त्याने अगणित संपत्ती लुटली व अशाच हावेपोटी त्याने देवमाता अदितीची कुंडले व वरुणाचे विशाल छत्रही बळकावले. त्याला मिळालेल्या वरामुळे तो देव, गंधर्व व मानवांना तापदायक झाला होता. अनेक गिरिदुर्गांनी वेढलेले प्राग्ज्योतिषपूर हे नगर त्याची राजधानी होती. ही राजधानी अनेक वेगवेगळ्या प्रकारच्या खंदकांनी, अग्नी, पाणी इत्यादींनी वेढलेली होती. या दुर्जय राजधानीवर कृष्णाने गरुडावर स्वार होऊन चाल केली. कृष्णाने नरकासुराच्या देहाचे दोन तुकडे करत त्याचा वध केला. नरकासुरवधाने देवादिकांना, तसेच प्रजेला आनंद झाला. नरकासुराच्या बंदिवासातील कुमारिकांना त्यांचे स्वजन स्वीकारणार नाहीत हे जाणून कृष्णाने या १६,१०० कन्यांसोबत विवाह केला व त्यांना सामाजिक प्रतिष्ठा मिळवून दिली. कृष्णाच्या पराक्रमाचे स्मरण म्हणून आश्विन कृष्ण चतुर्दशीस नरक चतुर्दशी हा सण साजरा केला जातो. या दिवशी अभ्यंगस्नानाचे महत्त्व असते. सकाळी लवकर उठून, संपूर्ण शरीरास तेलाचे मर्दन करून, सुवासिक उटणे लावून, सूर्योदयापूर्वी केलेले स्नान म्हणजे अभ्यंगस्नान. या दिवशी पहाटे यमासाठी नरकात म्हणजे आधुनिक परिभाषेत घरातील आदल्या दिवशी घासून पुसून स्वच्छ केलेल्या स्वच्छतागृहात पणती लावण्याची प्रथा आहे.

वर्षक्रियाकौमुदी, धर्मसिंधु इ. ग्रंथांमध्ये सांगितले आहे की अश्विन कृष्ण चतुर्दशी आणि अमावास्येला संध्याकाळी लोकांनी आपल्या हातात मशाली घेऊन त्या आपल्या दिवंगत पूर्वजांसाठी दाखवाव्यात आणि प्रार्थना करावी.

**पावसाळा संपून नवीन पिके हाती आल्यानंतर शरद ऋतूच्या ऐन मध्यभागी अश्विन व कार्तिक या महिन्यांच्या संधिकालात दिवाळी सण येतो. अश्विन वद्य द्वादशी ते कार्तिक शुद्ध द्वितीया हे सहा दिवस या सणाचे असतात. हा सण साधारणपणे ऑक्टोबर–नोव्हेंबरदरम्यान येत असतो. प्रकाशाचा सण म्हणून तो ओळखला जातो.**




**लक्ष्मीपूजन**

अश्विन अमावास्येस लक्ष्मीपूजन केले जाते. या दिवशी प्रदोषकाळी (संध्याकाळी) लक्ष्मीचे पूजन केले जाते. लक्ष्मी ही फार चंचल असते असा समज आहे. त्यामुळे शक्यतोवर हिंदू शास्त्राप्रमाणे लक्ष्मीपूजन हे लक्ष्मी स्थिर रहावी म्हणून स्थिर लग्नावर करतात. त्याने लक्ष्मी स्थिर राहते असा समज आहे. अनेक घरांत श्रीसूक्तपठणही केले जाते. व्यापारी लोकांचे हिशोबाचे नवीन वर्ष (विक्रमसंवत्) लक्ष्मीपूजनानंतर सुरू होते. या दिवशी सर्व अभ्यंग स्नान करतात. पाटावर रांगोळी काढून तांदूळ ठेवतात. त्यावर वाटी किंवा तबक ठेवतात. त्यात सोन्याचे दागिने, चांदीचा रुपया, दागिने ठेवून त्यांची पूजा करतात. महाराष्ट्रात लक्ष्मी पूजनाला भेंड, बत्तासे, साळीच्या लाह्यांचा नेवैद्य दाखवण्याची पद्धत आहे. हा दिवस व्यापारी लोक फार उत्साहात साजरा करतात. या दिवशी लोक स्वच्छता करण्यासाठी लागणारी नवी केरसुणी विकत घेतात. तिलाच लक्ष्मी मानून तिच्यावर पाणी घालून हळद–कुंकू वाहून घरात वापरण्यास सुरुवात करतात.केरसुणीने घर स्वच्छ होऊन घरातील अलक्ष्मी म्हणजे दारिद्र्य दूर होते असे मानले जाते.

प्राचीन काळी या रात्री कुबेरपूजन करण्याची रीत होती. कुबेर हा देवांचा खजिनदार आणि धनसंपत्तीचा स्वामी मानला जातो. दीपप्रज्वलन करून यक्ष आणि त्यांचा अधिपती कुबेराला निमंत्रित करून त्याची पूजा करणे हा मूळचा सांस्कृतिक कार्यक्रम होता, परंतु गुप्तकाळात वैष्णव पंथाला राजाश्रय मिळाल्याने आधी कुबेराबरोबरच लक्ष्मीचीही पूजा होऊ लागली. भारतात, विविध ठिकाणी झालेल्या उत्खननात कुशाण काळातील अनेक मूर्ती सापडल्या आहेत. त्यामध्ये कुबेर आणि लक्ष्मी एकत्र दर्शविले आहेत. काही मूर्तींमध्ये कुबेर त्याची पत्नी इरितीसह दाखविला आहे. यावरून असे दिसते की प्राचीन काळी कुबेर आणि त्यांची पत्नी इरिती यांची पूजा केली जात असावी. कालांतराने इरितीचे स्थान लक्ष्मीने घेतले आणि पुढे कुबेराच्या जागी गणपतीला प्रतिस्थापित केले गेले.

लक्ष्मीपूजनाच्या निमित्ताने आर्थिक व्यवहारातील सचोटी व नीती आणि अर्थप्राप्तीच्या साधनांविषयी कृतज्ञता अशी दोन महत्त्वाची मूल्ये मनात रुजतात, ही या पूजेची विशेषता आहे. भगवान महावीर मोक्षाला गेल्यानंतर त्याच दिवशी संध्याकाळी महावीरांचे प्रमुख शिष्य गौतम गणधर यांना केवल ज्ञान प्राप्त झाले. म्हणूनच दिवाळीच्या संध्याकाळी लक्ष्मीपूजन केले जाते ते संपत्तीरूपी लक्ष्मी मिळवण्यासाठी नव्हे, तर मोक्ष–लक्ष्मी किंवा आत्मकल्याणरूपी लक्ष्मी मिळवण्यासाठी. गणधर त्यांचा दिव्य–ध्वनी सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवितात. दिवाळीसाठी पूर्वी जमिनीवर आणि राजस्थानातील प्रथेप्रमाणे तांदळाच्या ओल्या पिठाची रांगोळी काढतात. त्याला 'मांडणे' असे म्हणतात. त्यावर पाट मांडून लक्ष्मीपूजन किंवा ओवाळणे आदी विधी केले जातात.

**लक्ष्मीपूजन, बलिप्रतिपदा**

कार्तिक शुद्ध प्रतिपदेस बलिप्रतिपदा हा सण साजरा केला जातो. हा दिवस दिवाळी पाडवा म्हणून ही ओळखतात, या दिवशी बळी राजाचे रांगोळीने चित्र काढतात व त्याची पूजा करतात आणि 'इडा पीडा टळो व बळीचे राज्य येवो' असे म्हणतात. साडेतीन मुहूर्तातील एक मुहूर्त म्हणून या दिवसाला विशेष महत्त्व आहे. शेतकरी पहाटे स्नान करून डोक्यावर घोंगडी घेतात व एका मडक्यात कणकेचा पेटता दिवा घेऊन शेतात जातात व ते मडके शेताच्या बांधावर खड्डा करून पुरतात. काही ठिकाणी बळीची अश्वारूढ प्रतिमा करून तिची पूजा केली जाते. शेणाचा बळीराजा करण्याची प्रथाही अस्तित्वात आहे. या शेणाला शुभा असे म्हणतात. असा हा लोककल्याणकारी राजा बळी, त्याच्या पूजनाचा दिवस. या दिवशी विक्रम संवत सुरू होतो. पाडवा हा साडेतीन मुहूर्तांपैकी हा एक मुहूर्त आहे. आर्थिक हिशोबाच्या दृष्टीने व्यापारी लोक दिवाळीतील पाडवा ही नववर्षाची सुरुवात मानतात. लक्ष्मीप्राप्तीसाठी नव्या वह्यांचे पूजन करून व्यापारी लोक वर्षाचा प्रारंभ करतात. व्यापारी लोकांच्या जमा–खर्चाच्या कीर्द–खतावणीच्या नवीन वह्या ह्या दिवशी सुरू होतोत. नवीन वह्या सुरू करण्यापूर्वी वह्यांना हळद–कुंकू, गंध, फूल, अक्षता वाहून पूजा करतात. व्यापारी या दिवशी मुहूर्ताने व्यवहार सुद्धा करतात. घरोघरी सायंकाळी पाटाभोवती रांगोळी काढून पत्नी पतीला औक्षण करते व पती पत्नीला ओवाळणी घालतो. नवविवाहित दांपत्याची पहिली दिवाळी पत्नीच्या माहेरी साजरी करतात. ह्यालाच दिवाळसण म्हणतात. त्यानिमित्त यादिवशी जावयास आहेर करतात. दक्षिण भारतात या दिवशी बलीची प्रतिमा तयार करून ती गोठ्यात ठेवतात व तिची पूजा करतात. गायी–बैलांना रंग लावून रंग लावून व माळा लावून सजवतात. पाताणे प्रभू (पाठारे प्रभू) लोकांत बळीची अश्वारूढ प्रतिमा उंच जागी उभी करून तिच्या भोवती एकवीस दिवे मांडण्याचीही चाल आहे.

**भाऊबीज**

कार्तिक शुद्ध द्वितीयेस भाऊबीज हा सण साजरा केला जातो. या दिवशी यम आपली बहीण यमी हिच्या घरी जेवायला गेला म्हणून या दिवसाला यमद्वितीया असे नाव मिळाले असे मानले जाते. बंधू–भगिनींचा प्रेमसंवर्धनाचा हा दिवस आहे. या दिवशी बहिणीच्या घरी भाऊ गोडधोड भोजन करतो आणि सायंकाळी चंद्राची कोर दिसल्यानंतर बहीण प्रथम चंद्रकोरीस व नंतर भावाला ओवाळते. भाऊ मग ओवाळणीच्या ताटात ओवाळणी देऊन बहिणीचा सत्कार करतो. भावा–बहिणीच्या नात्याचा एक तरी सण प्रत्येक समाजात असतोच. भाऊबीजेच्या दिवशी चित्रगुप्ताची पूजा होते. हा दिवस कायस्थ समाजाचे लोक चित्रगुप्ताची जयंती म्हणून साजरा करतात. यंदा बलिप्रतिपदा, दिवाळी पाडवा आणि भाऊबीज एकाच दिवशी कार्तिक शुद्ध द्वितीयेस आले आहेत. **(साभार विकिपीडिया)**

## बदलते तंत्रज्ञान

## ५जी स्पीडकरिता जिओ वेलकम ऑफर

भारतातील सर्वांत मोठी सब्सक्रायबर बेस असलेली टेलिकॉम कंपनी रिलायन्स जिओने काही निवडक शहरांमध्ये दिवाळीपासून ५जी सेवा मिळायला सुरुवात होईल, अशी घोषणा केली आहे. जिओ ट्रू ५जी लॉन्चसोबतच कंपनी ५जी नेटवर्कवर ग्राहकांना एक Gbps पर्यंतची स्पीड देणार आहे. जर आपली इतरांच्या आधी जिओच्या ५त्र स्पीडचा फायदा घेण्याची इच्छा असेल तर याच्या वेलकम ऑफरचा फायदा घेऊ शकता.




जिओची ५जी टेक्नॉलॉजी 700MHz बँडवर अवलंबून आहे आणि ही भारतात एसए (स्टँडअलोन) ५जी सेवा देणारी एकमेव कंपनी असल्याचा दावा कंपनीने केला आहे. जिओने दिल्ली, मुंबई, कोलकाता आणि वाराणसीमध्ये ५जीची टेस्टिंग सुरू केले आहे, मात्र आपण या शहरांमध्ये राहत असाल तरीही आपल्याला या सेवेचा लाभ घेण्यासाठी एका विशिष्ट प्रक्रियेतून जावे लागेल. अर्थात या सेवेचा लाभ अपोआप मिळणार नाही.

रिलायन्स जिओची ५जी सेवा काही निवडक शहरांमध्ये इन्व्हाइट–ओनली मोडमध्ये मिळेल. अर्थात आपल्याला ५जी सेवेचा लाभ घेण्यासाठी एका इन्व्हाइटची आवश्कता असेल. या सेवेचा लाभ घेण्यासाठी आपण वरील चार शहरांपैकी एका शहरात असणे आवश्यक आहे. याचबरोबर आपल्याकडे ५जी–एनेबल्स स्मार्टफोन असणेही आवश्यक आहे. यानंतर, रियलमी, वनप्लस, व्हीवो, सॅमसंग, शाओमी आणि आयक्यू०० फोन यूजर्स वेलकम ऑफरचा भाग बनण्याचा प्रयत्न करू शकतात.

आपल्याला सर्वप्रथम ५जी फोनमध्ये माय जिओ ॲप इंस्टॉल करावे लागेल. येथे ॲप ओपोन केल्यानंतर आणि आपल्या जिओ नंबरच्या सहाय्याने लॉगिन केल्यानंतर, आपल्याला होम–स्क्रीन दिसेल. जर आपण जिओची ५जी सेवा टेस्ट सुरू असलेल्या शहरात राहत असाल तर आपल्याला सर्वात वर 'जिओ वेलकम सर्व्हिस' लिहिलेले दिसेल. या कार्डवर टॅप केल्यानंतर आपल्याला ५जी सेवेचा लाभ घेता येईल आणि आपल्याला एनरोल करण्यात येईल.

टॉप कार्डवर टॅप केल्यानंतर, स्क्रीनवर मेसेज दिसेल. धन्यवाद! जिओ ट्रू ५जीसोबतचा आपला प्रवास सुरू होत आहे. खरेतर जर यूजरचा मोबाईल ५जी कंपेटिबल असेल आणि जिओच्या ५जी बँड्सला सपोर्ट करत असले तर त्याला 'जिओ वेलकम ऑफरचे इन्व्हाइट पाठवले जाईल. हे इन्व्हिटेशन मिळाल्यानंतरच ५जी इंटरनेट स्पीड्सचा फायदा मिळायला सुरुवात हेईल, असे कंपनीने स्पष्ट केले आहे.

# संगीतभूषण पं. राम मराठे

**निमित्त**

प्रसिद्ध मराठी ख्यालगायक, गायक–नट व संगीत दिग्दर्शक रामचंद्र पुरुषोत्तम मराठे अर्थात पं. राम मराठे यांचा आज जन्मदिन. २३ ऑक्टोबर १९२४ रोजी पुणे येथे पुरुषोत्तम व मथुराबाई या दाम्पत्यापोटी त्यांचा जन्म झाला. ते यांचे दुसरे अपत्य. त्यांच्या वडिलांची पुणे येथे खानावळ होती. लहानपणीच त्यांची संगीताची ओढ वडिलांनी लक्षात घेतली. वडील व काका गजानन यांच्याकडून रामभाऊंवर गाण्याचे व अभिनयाचे संस्कार झाले. त्यांचे शालेय शिक्षण भावे स्कूलमध्ये झाले. सुरुवातीस त्यांनी मुळे यांच्याकडे गाण्याचे व अंबीटकर यांच्याकडे तबल्याचे शिक्षण घेतले. त्यांची मोठी बहीण गोदावरी ही गोपाळ गायन समाज येथे शास्त्रीय संगीत शिकायला असे. तिच्याबरोबर ठेका धरण्यास ते जात. त्या काळातील गाजलेल्या ध्वनिमुद्रिकांचे श्रवण करून त्यांचे हुबेहूब अनुकरण ते करीत व लहान–मोठ्या कार्यक्रमात आपली कला सादर करत.

मराठे यांना 'सागर फिल्म' या संस्थेच्या धरम की देवी (१९३५) या चित्रपटात बालकलाकाराची भूमिका मिळाली. येथून त्यांचे चित्रपटातील अभिनय क्षेत्रात पदार्पण झाले. त्यानंतर १९४०पर्यंत 'मेहबूब फिल्म' या चित्रपटनिर्मिती संस्थेच्या मनमोहन (१९३६), जागीरदार (१९३७) आणि वतन




(१९३८) या चित्रपटांत त्यांनी काम केले तसेच न्यू थिएटरच्या लाईफ इज अ स्टेज या इंग्रजी चित्रपटातही त्यांनी काम केले. याशिवाय जयंत पिक्चर्स, इम्पिरिअल फिल्म आदी चित्रपटसंस्थांच्या चित्रपटांतही त्यांनी विविध भूमिका केल्या. प्रभात फिल्मच्या माणूस, गोपाळकृष्ण या चित्रपटांतील त्यांच्या भूमिका गाजल्या, पण त्यांची ओढ अभिजात शास्त्रीय संगीताकडे होती. त्यामुळे त्यांनी मास्तर कृष्णराव यांच्याकडून शास्त्रीय संगीताचे धडे घेण्यास प्रारंभ केला (१९४१). पुढे त्यांना पं. वामनराव सडोलीकर (१९४० ते ४२), पं. मनोहर बर्वे, पं. यशवंतराव मिराशीबुवा (१९४७–५०) जगन्नाथबुवा पुरोहित (१९५२–६८) उस्ताद विलायत हुसेनखाँ तसेच बी. आर. देवधर यांची तालीम व मार्गदर्शन मिळाले.

शास्त्रीय संगीत आत्मसात केल्यानंतर रामभाऊंनी ग्वाल्हेर, जलंदर, पाटणा, कोलकाता, दिल्ली व अमृतसर येथील शास्त्रीय संगीत संमेलनामध्ये भाग घेतला. नटवर्य गणपतराव बोडस यांच्या आग्रहास्तव त्यांनी संगीत सौभद्र या नाटकातील कृष्णाच्या भूमिकेद्वारे संगीत रंगभूमीवर पदार्पण केले (१९५०). बालगंधर्व, हिराबाई बडोदेकर, केशवराव दाते, विनायकबुवा पटवर्धन, जयमाला शिलेदार, नानासाहेब फाटक इत्यादींबरोबर त्यांनी एकच प्याला, संशयकल्लोळ, स्वयंवर, मंदारमाला, सौभद्र, जय जय गौरीशंकर (१९६६) इत्यादी नाटकांत भूमिका केल्या. तसेच काही नाटकांचे संगीत दिग्दर्शन केले आणि अहिरभैरव, बैरागी, जोगकंस, अभोगी, बागेश्री कंस, बसंतबहार इ. रागांचा कौशल्यपूर्ण प्रयोग त्यांत केला.

रामभाऊंच्या गायनाच्या अनेक ध्वनिमुद्रिका प्रसिद्ध आहेत. एचएमव्ही (हीज मास्टर्स व्हॉईस) कंपनीने त्यांनी गायलेल्या देस, अडाणा, भीमपलास आणि सूरमल्हार या रागांच्या गायनाच्या ध्वनिमुद्रिका प्रकाशित केल्या आहेत. संगीतकार स्नेहल भाटकर यांचे संगीत असलेली त्यांच्या भावगीत गायनाची ध्वनीमुद्रिका काढण्यात आली (१९५३). बालगंधर्व गायकीचे यथार्थ दर्शन घडविणाऱ्या त्यांच्या काही ध्वनिमुद्रिका प्रकाशित झाल्या आहेत. रामभाऊंनी त्यांच्या संगीत कारकीर्दीत अनेक विद्यार्थ्यांना विनामूल्य विद्यादानाचे कार्य केले (१९६५–८९). रामभाऊंचे मुंबई येथे अल्पशा आजाराने निधन झाले.

**क्लिक...क्लिक...!**



पनवेल : दीपावलीनिमित्त बाजारात आकर्षक आकाशकंदिल विक्रीसाठी आले आहेत. (छाया : संस्कृती पाटील)

## आरोग्य प्रहर

## नाश्ता, जेवण शक्यतो वेळेवरच करावा!



बदलत्या जीवनशैलीमध्ये सर्वात जास्त दुर्लक्ष आहाराकडे होते. कामाचा ताण, रोजच्या डेडलाईन्स यामध्ये अनेकांना वेळेवर जेवता येत नाही. याचा परिणाम आरोग्यावर झालेला दिसून येतो. वेळेवर न जेवल्यास वजन वाढणे, सतत अपचन होणे यांसारख्या समस्या उद्भवू शकतात. या उलट वेळेवर जेवल्याने निरोगी राहण्यास मदत मिळते. दिवसभरात कोणत्या वेळी जेवण करणे आरोग्यासाठी फायदेशीर ठरू शकते जाणून घ्या.

नाश्ता : सकाळचा नाश्ता हा आरोग्यासाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जातो, कारण यामुळे दिवसभरातील काम करण्यासाठी शरीराला ऊर्जा मिळते. नाश्त्यामध्ये अंडी, दूध, शेंगदाणे अशा प्रोटीनयुक्त पदार्थांचा समावेश करू शकता. सकाळी ६ ते ९.३० या वेळेत नाश्ता करावा.

दुपारचे जेवण : डेडलाईनच्या टेन्शनमध्ये बऱ्याच वेळा दुपारचे जेवण करायला वेळ मिळत नाही. त्यामुळे एक तर दुपारी जेवण करणे टाळले जाते किंवा दुपार संपल्यानंतर संध्याकाळी जेवण केले जाते, पण यामुळे अपचनासारख्या समस्या उद्भवू शकतात. त्यामुळे दुपारचे जेवण १ वाजेपर्यंत करावे.

रात्रीचे जेवण : रात्री आपण जे अन्नपदार्थ खातो त्याचा आरोग्यावर सर्वात जास्त परिणाम होतो. कारण रात्री शरीराची हालचाल कमी होते. त्यामुळे रात्रीच्या जेवणात जास्त कॅलरी असणारे अन्नपदार्थ खाणे टाळावे. याएवजी पालेभाज्या, प्रोटीनचे प्रमाण जास्त असणाऱ्या पदार्थांचा आहारात समावेश करावा. रात्रीचे जेवण इतक्या लवकर करता येऊ शकेल तितक्या लवकर करावे. जेवल्यानंतर लगेच झोपू नये. त्यामुळे अपचनाची समस्या उद्भवू शकते.

आता हिवाळा सुरू होत आहे. हिवाळ्यात साधारणपणे भूक वाढते. ती मारू नये. योग्य वेळी नाश्ता, जेवण केल्यास आरोग्यासाठी लाभदायी ठरते.

(येथे देण्यात आलेली माहिती घरगुती उपचार आणि सामान्य माहितीवर आधारित आहे. अधिक माहितीकरिता तज्ज्ञांचा सल्ला घ्या.)

# खंडाळा घाटात अपघाताला लागणार ब्रेक

### मिसिंग लिंक प्रगतिपथावर

**मिसिंग लिंकमुळे सर्वाधिक अपघाताचा टप्पा वगळला जाणार असून बोरघाटात कायम दरडीचा असलेला धोका मिसिंग लिंकवर नसेल. घाटाची वाहतूक कोंडीतून सुटका होवून अंतर कमी झाल्याने वीस ते पंचवीस मिनिटे जलद प्रवास होणार आहे.**

### बोगद्याचे वैशिष्ट्य

**भारतातील पहिला २१.४५ मीटर रूंदीचा बोगदा असून प्रत्येक तीनशे मीटरवर बोगद्याला बाह्यमार्ग असेल. त्यामुळे काही आपत्ती आल्यास बोगद्यात अडकून बसावे लागणार नाहि.**



**खोपोली : प्रतिनिधी**

'हिरव्या हिरव्या पानांची झाडी घनदाट, सांगो चेढवा दिसतो कसा खंडाळ्याचा घाट' या गाण्याच्या ओळी घाटाचे सौंदर्य, कुतूहल आणि ओढ वाढवते. पण हाच घाट अपघातामुळे भीतीदायक बनला असून, वीस वर्षांत शेकडो बळी या घाटात गेले असून, अवघ्या तीन दिवसात सहा अपघातात चौदा वाहनांचा अपघात तर दोन ठार आणि दहापेक्षा अधिक गंभीर जखमी ही आकडेवारी भयावह आहे. मात्र 'मिसिंग लिंक' हा पर्यायी मार्ग खंडाळा घाटाला लागलेला अपघाताचा डाग पुसून टाकणार आहे.

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर बोरघाटाला पर्यायी मार्ग म्हणून मिसिंग लिंक तयार होत आहे. यामुळे मुंबई-पुणे अंतर आठ किलोमीटरने कमी होणार असून, अपघात आणि वीकेण्डला होणारी वाहतूक कोंडीची कटकट संपणार आहे. मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर खालापूर टोल नाका ते बोरघाट हद्दीत सर्वाधिक अपघात होत आहेत. यावर पर्याय म्हणून ६६९५.३७ कोटी रुपये बजेटचे मिसिंग लिंक तयार केले जात आहे. त्याचे काम प्रगतिपथावर असून खालापूर टोल नाक्यापासून चौथ्या मार्गिकेचे काम सुरू आहे. सहा पदरीमध्ये दोन मार्गिकेची भर पडणार आहे. त्यामुळे हा मार्ग आठ पदरी असणार आहे. मिसिंग लिंकसाठी ऐतिहासिक चावणी गावाच्या हद्दीत वायर लूप पद्धतीच्या पुलाचे काम सुरू आहे. दरी खोऱ्यातून जाणाऱ्या पुलाची जमिनीपासूनची उंची १३५ मीटर तर लांबी ६४५ मीटर असणार आहे. याशिवाय ९०० मीटर लांबीचे दोन संमातर पूल असणार आहेत. द्रूतगती मार्गावर तीन पूलांना चौथ्या मार्गिकेत संमातर पूल बांधण्यात येत आहे. याशिवाय डोंगराच्या पोटात १५० मीटर खालून दोन समांतर बोगद्याचे काम सुरू आहे. त्यापैकी बोगद्याचा अडीच किलोमीटरचा भाग लोणावळ्यातील धरणाच्या खालून जाणार आहे. त्यापैकी एक बोगदा १.७५ किलोमीटर लांबीचा असून त्याला समांतर बोगदा असणार आहे. दुसऱ्या बोगद्याची लांबी ८.९२ किलोमीटर असून या बोगद्यालासुद्धा संमातर दुसरा बोगदा असेल. बोगद्याची रूंदी २१. ४५ मीटर आहे.

**काम दृष्टिक्षेपात**
**भारतातील पहिला केबल पूल**
**पुलाची उंची १३५ मीटर**
**पुलाची लांबी ६४५ मीटर**

मिसिंग लिंक खालापूर टोल नाका ते थेट लोणावळा हद्दीत सिंहगड कॉलेज असा असणार आहे. ऑफकॉन कंपनी मिसिंग लिंकचे काम करत असून नवयुग इंजिनिअरींग बोगद्याचे काम करीत आहे. अवजड आणि महाकाय यंत्राच्या सहाय्याने सुरू असलेले हे काम अजून वर्षभर तरी चालणार असल्याने प्रवाशांना २०२४पर्यंत वाट पाहावी लागणार आहे.

## कर्जत रेल्वेस्थानकातील फलाटाची लांबी वाढविणार



**कर्जत : प्रतिनिधी**

येथील रेल्वेस्थानकातील फलाट क्रमांक १ची लांबी कमी असल्याने जास्त डब्बे असलेल्या लांब पल्ल्याच्या गाड्या दोन वेळा थांबतात. त्यामुळे प्रवाशांची धावपळ होऊन त्यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. या फलाटाची लांबी वाढवावी, अशी मागणी करण्यात येत होती. त्यानुसार मार्च २०२४पर्यंत या फलाटाची लांबी वाढविण्याचा निर्णय मध्य रेल्वे प्रशासनाने घेतला आहे.

कर्जत रेल्वेस्थानकावर एकूण तीन फलाट व एक इएमयु फलाट आहे. फलाट क्रमांक एकवर मुंबईहून पुण्याकडे जाणाऱ्या गाड्या येत असतात. मात्र या फलाटाची लांबी कमी असल्यामुळे जास्त डब्बे असलेल्या लांब पल्ल्याच्या गाड्या या फलाटावर दोन वेळा थांबविल्या जातात. त्यामुळे गाडी पकडण्यासाठी प्रवाशांची धावपळ होते. या गडबडीत अपघात होण्याची शक्यता असते. या फलाटावर डब्याची स्थिती दर्शविणारे छोटे इंडिकेटर्स बसविण्यात आले आहेत, मात्र दोन वेळा गाडी थांबत असल्याने एकाच ठिकाणी दोन इंडिकेटर्स बसविण्यात आले आहेत. त्यामुळे प्रवाशांमध्ये संभ्रम निर्माण होतो व कधी गाडी चुकते तर कधी समान फलाटावर राहते.

कर्जत रेल्वेस्थानकातील फलाट क्रमांक १ वर प्रवाशांना होणाऱ्या या त्रासाबद्दल सामाजिक कार्यकर्ते पंकज मांगीलाल ओसवाल यांनी रेल्वे प्रशासनाकडे विचारणा केली असता, रेल्वे प्रशासनाने सदर फलाटाची लांबी वाढविण्याचे काम मार्च २०२४पर्यंत करण्यात येणार असल्याचे ओसवाल यांना कळविले आहे.

## आमडोशी येथील घराला आग

**नागोठण : प्रतिनिधी**

परिसरातील आमडोशी येथील रोशन जांभेकर यांच्या घराला शनिवारी (दि. २२) दुपारी अचानक आग लागली.



या वेळी रोशन यांच्यासह त्यांच्या पत्नी रोशनी (वय २९), मुलगा अर्णव (वय ९), मुलगी आरोही (वय १०) घरात होते. मात्र आग लागल्याचे लक्षात येताच ते घराबाहेर पडले. त्यामुळे जीवित हानी टळली मात्र या आगीत घरातील साहित्याचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले.

आमडोशी येथील घराला आग लागल्याचे समजताच बाळासाहेबांची शिवसेना पक्षाचे (शिंदे गट) नागोठणे उपविभाग प्रमुख आकाश मढवी, मंदार कोतवल हे तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी रोहा तहसीलदार यांच्याशी संपर्क साधून घटनेची माहिती दिली. या घटनेत मोठ्या प्रमाणावर वित्तहानी झाल्याने जांभेकर कुटुंबावर ऐन दिवाळीत आर्थिक संकट ओढवले आहे.


# प्रतिबंधित प्लास्टिक पिशव्या वापरू नयेत; अन्यथा दंडात्मक कारवाई

## मुरूड नगर परिषदेकडून सूचनापत्रक जारी

**मुरूड : प्रतिनिधी**

प्लास्टिक बंदीच्या अंमलबजावणीसाठी मुरूड नगर परिषद पुन्हा एकदा सज्ज झाली आहे. प्रतिबंधित प्लास्टिक वस्तूंचा वापर करणाऱ्यांकडून दंडवसुली करण्यात येईल, अशा सूचनापत्रकांचे नगर परिषदेने मुरूड शहरात वाटप केले.

भारत सरकारच्या निर्देशनप्रमाणे प्लास्टिक बंदी लागू करण्यात आली आहे,



तरीदेखील मुरूड शहरात प्रतिबंधित प्लास्टिक वस्तूंचा विशेतः पातळ कॅरीबॅगचा वापर फार मोठ्या प्रमाणात होत आहे. नागरिकांनी प्रतिबंधित प्लास्टिक पिशव्या वापरू नयेत, अन्यथा शासनाच्या नियमाप्रमाणे कारवाई केली जाईल.

प्रतिबंधित प्लास्टिक पिशव्या आढळून आल्यास पहिल्यावेळी पाच हजार रुपये दंड आकारण्यात येणार आहे. प्रतिबंधित प्लास्टिक वस्तूंचा दुसऱ्यांदा वापर करताना पकडण्यास दहा हजार रुपये आणि तिसऱ्यांदा पकडण्यास २५ हजार रुपये दंड वसूल करण्यात येईल, असे या सूचना पत्रकांत म्हटले आहे. नगर परिषद कर्मचाऱ्यांनी या सूचना पत्रकांचे शहरातील बाजारपेठ, भाजी मार्केट, मासळी मार्केट परिसरात वाटप केले.


## जाहीर नोटीस

या नोटिसद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, माझे अशील **श्री. रामदास नामदेव पाटील,** यांच्या मालकीचे घर क्रमांक ३३,क्षेत्रफळ १०८५ चौ. फूट., चिपले, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड -४१०२०६.

तरी सदर मालमतेबाबत कोणाही व्यक्ती/व्यक्तीचे कुठल्याही प्रकारचे दावा हरकती असे विक्री, गहाण, ताबा, बक्षीस, भेट, भाडेपट्टा, वारसहक्क, लोन, बुकींग किंवा इतर जर असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यावर ७ दिवसांच्या आत दावेनीशी संबंधीत असलेल्या दस्तऐवजांची प्रमाणीत केलेल्या प्रतीसहीत, आमच्या कार्यालयीन पत्त्यावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा. सदर मिळकत ही आमचे आशिलांचे खुद्द मालकीची असून ती आता गहाण ठेवण्यात येत आहे. त्यानंतर कुठलेही प्रकारचे येणाऱ्या हरकती/तक्रारीचा विचार करण्यात येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

**सही/-**
**रेवती एन. खारके**
**ॲडव्होकेट उच्च न्यायालय**



## धाटाव विभागात परतीच्या पावसाचा धुमाकूळ

### भातपिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान; बळीराजा मदतीच्या प्रतीक्षेत

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील धाटाव विभागात गेल्या काही दिवसापासून परतीच्या पावसाने धुमाकूळ घातलेला आहे. सांयकाळी विजांच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस कोसळत असल्यामुळे भातपीकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. राज्य शासनाने अर्थिक मदत जाहीर केली असली तरी ती प्रशासनाकडून बाधित शेतकऱ्यांपर्यत पोचलेली नाही.

धाटाव विभागातील किल्ला, वाशी, लांढर, बोरघर, तळाघर, महादेववाडी, धाटाव मलखंडवाडी, रोठ खुर्द, रोठ बुद्रुक, बारसोली, निवी, कारीवणे या गावातील शेतकऱ्यांनी यंदा जया, रुपाली, कोलम, देवकी, रत्ना, सारथी या जास्त उत्पादन देणाऱ्या बियाणांची पेरणी केली होती. पिकेही चांगली आली होती. काही ठिकाणी पिके कापण्याइतकी तयार झाली होती. दसरा झाला की, भातपीक कापणीची लगबग



सुरू होते. मात्र मागील काही दिवसांपासून धाटाव परिसरात परतीच्या पावसाने धुमाकूळ घातला आहे. त्यामुळे शेतांत पाणी साठले आहे. तयार भातपिक शेतात आडवे झाल्याने त्याला कोंब फुटले आहेत. शेतात पाणी साचल्याने भातपीक कुजण्याची शक्यता आहे. हाता-तोंडाशी आलेले पीक हिरावून जाते की काय, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. परतीच्या पावसामुळे भाताचे उत्पादन घटण्याची शक्यता आहे.

संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना राज्य शासनाने अर्थिक मदत जाहीर केली आहे. मात्र ही मदत अजूनही बाधित शेतकऱ्यांपर्यंत पोचलेली नाही. धाटाव विभागातील शेतकरी अद्यापही मदतीच्या प्रतीक्षेत आहे.

**पाऊण एकरामध्ये भात बियाण्याची पेरणी केली होती. भाताच्या लोंबीला दाणे आले होते. मात्र ढगाळ वातावरण व परतीच्या पावसामुळे अर्धे पीक वाया गेले आहे.**

**-गणेश सुतार, शेतकरी, महादेववाडी, ता. रोहा**

**राज्य शासनाच्या निर्देशानुसार ज्या शेतकऱ्यांचे ३३ टक्क्यापेक्षा अधिक भात शेतीचे नुकसान झाले असेल, अशा शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळेल. तालुका कृषी अधिकाऱ्यांबरोबर बैठक घेऊन शेतकऱ्यांना लवकरात लवकर आर्थिक मदत देण्यात येईल.**

**-कविता जाधव, तहसीलदार, रोहा**

## विहूर आदिवासीवाडीत दिवाळी फराळ, कपडे वाटप



**मुरूड : प्रतिनिधी**

अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्स मुरुड-जंजिरा, रायगड महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे प्रभारी प्राचार्य डॉ. साजिद शेख यांच्या मार्गदर्शनाखाली विहूर आदिवासीवाडी येथे शनिवारी (दि. २२) दिवाळी फराळ, खाऊ व कपडे वाटप करण्यात आले.

महाविद्यलयातील शिक्षक व शिक्षकत्तेर कर्मचारी तसेच राष्टीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी विहूर आदिवासीवाडीतील लहान मुलांना व ग्रामस्थांना दिवाळी फराळ व कपडे वाटप करून त्यांची दिवाळी आनंदात साजरा करण्याचा प्रयत्न केला.

महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी प्रा. नितीन पवार, प्रा. समीक्षा माळी, प्रा. अल्ताफ फकीर, जुहेब मोदी, तसेच जय खानविलकर, अमोघ मयेकर, अलीया केसरकर, उम्मे कुलसुम हद्दादि, मुबशिरा सरगुरू, हलीमा दुराणी, श्रेया बाजी, तन्वी म्हात्रे या स्वयंकसेवकांनी हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले केले.


## तहसिलदार पनवेल यांचे न्यायालयात

कुळ कायदा कलम ७० ब फेरचौकशी दावा क्र.१/२०२२
(जुना ७० ब दावा क्र. ३/२०१५)

प्रति,

१. लक्ष्मण बामा चौधरी मयत
२. कान्हा बामा चौधरी मयत
३. लक्ष्मीबाई कान्हा चौधरी
४. सुनिल कान्हा चौधरी
५. अनिल कान्हा चौधरी रा. शिरढोण, ता. पनवेल, जि. रायगड
६. शिला तुळशिदास चोरघे रा. बेलवली, ता. पनवेल
७. गुणा तुकाराम हुद्दार रा. नादगांव, ता. पनवेल
८. सुरेखा कृष्णा वाजेकर
९. अक्षता हरिभाऊ वाजेकर रा. शिरढोण, ता. पनवेल, जि. रायगड
१०. रंजना रमण मुंढे रा.जांभिवली, ता. खालापूर, जि.रायगड
११. नामदेव बामा चौधरी मयत वारस
१२. चंद्रभागा नामदेव चौधरी
१३. अनंता नामदेव चौधरी
१४. वासंती गोमा भोपी
१५. निरा हरिश्चंद्र मोकल
१६. सुवर्णा ज्ञानेश्वर चौधरी सर्व रा. शिरढोण, ता. पनवेल, जि. रायगड

अर्जदार

**विरूध्द**

१. जहरुद्दीन बहाऊददीन बक्षी मयत वारस
ईस्साम जुहरुद्दीन बक्षी
रा. आकाश अपार्ट,सदनिका क्र.५, ४था मजला,
आगरी पाडा, मुंबई-११
२. मुकुंद गणेश कर्वे मयत वारस
२/१. विनायक मुकुंद कर्वे
२/२. निर्मला मुकुंद कर्वे
२/३. विष्णू गणेश कर्वे
३. गोविंद गणेश कर्वे मयत वारस
४. कमल दत्तात्रेय काळे मयत वारस
५. कमळ विनायक जोशी
६. मंगळ गोपाळ अभ्यंकर मयत वारस
७. सुधा पांडूरंग गोखले मयत वारस
८. पांडू चांगो चौधरी मयत वारस
९. अनुसया पांडू चौधरी
१०. भगवान पांडू चौधरी मयत वारस
१०/१. सुशिला भगवान चौधरी
१०/२. जयश्री यशवंत म्हात्रे
रा. शिरढोण, ता. पनवेल, जि. रायगड
१०/३. सरिता हिरु गडगे रा. कामधेनू बिल्डींग सदनिका क्र.२०३
से.१, रोड, नं.६, एस.एन.एल.जोशी शेजारी,नवीन पनवेल, ता.पनवेल

सामनेवाला

सामनेवाले क्र.२/१, २/२, २/३, ५, ९,१०/१, १०/२ यांना या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त नमुद केलेल्या प्रश्नाधीन मिळकतीबाबत मा.उपविभागीय अधिकारी पनवेल यांनी त्यांचेकडील क्र.टेनन्सी/कात४/आरटीएस अपील क्र.९६/२०१९ दिनांक ४.२.२०२२ रोजीच्या आदेशान्वये प्रस्तुत प्रकरण या न्यायाधिकरणाकडे फेरचौकशीकामी पाठविणेत आलेले आहे. प्रस्तुत दाव्यामध्ये वेळोवेळी सुनावणी घेण्यात आलेल्या आहेत. मात्र प्रस्तुत प्रकरणातील सामनेवाले क्र. २/१, २/२, २/३, ५, ९,१०/१, १०/२ हे या न्यायालयात सुनावणीकामी हजर झालेले नाहीत. यास्तव सदर दाव्याची पढील सनावणी निम्नस्वाक्षरीतांच्यासमोर दिनांक १५/११/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता तहसिल कार्यालय पनवेल यांचे कार्यालय, साईनगर, तलाठी प्रशिक्षण केंद्र, पनवेल, जि.रायगड येथे निश्चित करण्यांत आली आहे.

सबब, या जाहीर नोटीसीद्वारे अर्जदार व सामनेवाले यांना तसेच वरील जमिन मिळकतीशी हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी दिनांक१५/११/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता तहसिल कार्यालय पनवेल, जि.रायगड येथे समक्ष येऊन आवश्यक त्या सबळ कागदोपत्री पुराव्यांसह लेखी म्हणणे दाखल करावे. सदर विहीत केलेल्या मुदतीनंतर कोणाचीही व कोणत्याही प्रकारची हरकत प्राप्त झाल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी.

**दावा जमिनीचे वर्णन**

| गावाचे नाव | स.नं./हि.नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| मौजे शिरढोण,ता.पनवेल | ३०४ | ०.२६.८ | ५.०० |

सदरची जाहिर नोटीस आजरोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी दिली.
ठिकाण :- पनवेल
दिनांक :-२१/१०/२०२२

शिक्का

**सही/-**
**तहसिलदार पनवेल**


# सव्वा तीन वर्षांनी मिनीट्रेन पुन्हा रुळावर

## नेरळ-माथेरान-नेरळ दिवसातून दोन फेऱ्या होणार

**कर्जत : प्रतिनिधी**

अमन लॉजजवळ अपघात झाल्याने नेरळ-माथेरान-नेरळ या नॅरोगेज मार्गावरील प्रवासी वाहतूक मे २०१९मध्ये बंद झाली होती. त्यानंतर अतिवृष्टीमध्ये या मिनीट्रेनच्या मार्गाची दुरवस्था झाली होती. तब्बल सव्वा तीन वर्षांनंतर या नॅरोगेज मार्गावर शनिवारी (दि. २२) नेरळ-माथेरान-नेरळ प्रवासी मिनीट्रेन पुन्हा एकदा सुरू झाली. त्यामुळे माथेरानचा पर्यटन हंगाम चांगला जाण्याचे संकेत मिळत आहेत.

माथेरान येथून नेरळकडे येणारी मिनीट्रेन मे २०१९मध्ये एका आठवड्यात एकाच ठिकाणी दोन वेळा रुळावरून घसरली होती. त्यामूळे मिनीट्रेनची प्रवासी सेवा बंद करण्यात आली होती. त्यानंतर पावसाळ्यात नॅरोगेज मार्गाचे मोठे नुकसान झाले होते. त्यामुळे हा मार्ग मजबूत आणि अपघात मुक्त करण्याचा निर्णय रेल्वे प्रशासनाने घेतला आणि नेरळ-माथेरान या २१ किलोमीटर लांबीच्या रेल्वे मार्गावर कामे सुरू करण्यात आली होती.

नेरळ-माथेरान गाडीची चाचणी २० ऑक्टोबर रोजी यशस्वी झाल्यानंतर मिनी ट्रेनची नेरळ-माथेरान-नेरळ अशी प्रवासी वाहतूक शनिवारपासून पुन्हा रुळावर आली



आहे. तब्बल सव्वा तीन वर्षांनी मिनी ट्रेन सुरु होत असल्याने नेरळ लोको कार्यशाळेतील कर्मचारी आणि अभियंते यांच्यात मोठा उत्साह होता. मिनी ट्रेनच्या पहिल्या प्रवासी गाडीसाठी एनडीएम ४०३ इंजिन लावण्यात आले होते. या इंजिनाची पूजा करण्यात आली. गाडीला फुलांनी सजविण्यात आले होते. पहिल्या गाडीचे पहिले तिकीट फिरोज अहमद या पर्यटकाने घेतले.

### भाग्यवान प्रवासी

मुंबई सेंट्रल येथील फिरोज अहमद हे शनिवारी सकाळी साडेसहा वाजता रांगेत उभे होते. त्यांनी आपल्या ११ जणांच्या कुटुंबासह पहिले तिकीट मिळावीत मिनी ट्रेनमधून प्रवास सुरू केला. विस्टा डोममधील भाग्यवान प्रवासी मुंबई येथील अभिषेक सिंह यांनी पहिले तिकीट मिळविले. नेरळ-माथेरान पहिल्या प्रवासी गाडीसाठी सहा डब्बे लावण्यात आले होते. त्यातील द्वितीय श्रेणीचे तीन डब्बे तसेच विस्टा डोम हा १६ प्रवासी क्षमता असलेला वातानुकित डब्बा आणि कुपे असे सर्व प्रवासी डब्बे फुल्ल होते.त्यातील द्वितीय श्रेणीमधून ९० तर विस्टा डोममधील १६ प्रवासी यांनी प्रत्येकी ६५० रुपयांची तिकीट खरेदी केली तर पहिल्या कुपे फॅमिली डब्यातून पाच प्रवासी यांनी १५२५ रुपयांची तिकीट काढून प्रवास केला.

**मिनिट्रेनचे वेळापत्रक**


**नेरळ : माथेरान**
सकाळी ८.५० : ११.३०
दुपारी २.२० : संध्याकाळी ५.००

**माथेरान : नेरळ**
दुपारी ०२.४५ : सायंकाळी ५.३०
सायंकाळी ४.२० : सायंकाळी ७.००

पहिल्या गाडीसाठी एनडीएम ४०३ हे इंजिन लावण्यात आले होते, त्या इंजिनाच्या जबाबदारी के. टी. मतसार आणि सहाय्यक म्हणून मोमीन मुश्ताक आणि गार्ड म्हणून हरिचांद्र आहिरवार यांनी पार पाडली. तिकीट तपासनीस सेल्वा कुमार, ट्रॅफिक इन्स्पेटर सुबोध कुळकर्णी, बुकिंग क्लार्क संतोष जामघरे, रोहिदास लोगले आणि विनोद मेनन यांनी काम पाहिले. नेरळ स्थानक प्रबंधक गुरुनाथ पाटील यांनी पहिल्या गाडीला हिरवा झेंडा दाखवला. या वेळी सहाय्यक प्रबंधक मोहीत तांडेल, अंकित गुप्ता, वरिष्ठ अभियंता सुशांत सोनवणे, सुरक्षा दलाचे भावेश आदी उपसस्थित होते.

# प्रसंगी अखंडित वाचीत जावे

वाचाल तर वाचाल या सदरासाठी तीन-चार पुस्तके निवडताना साहित्यविश्वाच्या अथांग सागरातून चार मोती उचलण्यासारखे आहे. मी अमेरिकेत असल्यामुळे माझी लेक शिल्पाच्या ग्रंथसंग्रहातील उपलब्धतेनुसार साहित्यप्रकार, विषयातील विविधता, असा विचार करून पुस्तके निवडली. खरेतर वाचकांनी एकाच प्रकारची एखाद्याच आवडीच्या लेखकाची पुस्तके फक्त वाचण्यासाठी न निवडता विविध विषयांवरी पुस्तके वाचावीत. इथे मी विविध कालखंडातील लेखकांची जी पुस्तके वाचकांनी वाचावीच अशी वाटली ती निवडली आहेत. वि. स. खांडेकरांचे 'गोकर्णीची फुले', एस. एल. भैरप्पांची भाषांतरित 'सार्थ'कादंबरी, बाबुराव बागुलांचा 'जेव्हा मी जात चोरली'हा कथासंग्रह आणि कॅनडा स्थित राजू कोण्णूरांचे बर्फाचे वादळ आणि चहाच्या वाफा हे पुस्तक. या लेखकांची इतर पुस्तके वाचावी अशी उत्सुकता वाटेल. यासाठी ही पुस्तकांची थोडक्यात ओळख...





श्री. अनुपमा कुळकर्णी गडकरी, कर्जत
(सध्या वास्तव्य अमेरिका)

वाचाल तर वाचाल
साहित्यिकांची आवडती पुस्तके

## जेव्हा मी जात चोरली : बाबुराव बागूल

बाबुराव बागुलांच्या कथांमध्ये एकावेळी आनंद आणि भय या दोन्ही भावनांचा प्रत्यय येतो. दैन्य दुःख याने जीवन असह्य झालेल्या लोकांच्या कथा या संग्रहात आहेत. त्यांची प्रभावी भाषा वाचकांच्या मनात खळबळ निर्माण करते. शिरीष पै यांनी या पुस्तकाच्या प्रस्तावनेत म्हटले आहे. त्यांची काव्यात्मकता मला फार मोलाची वाटते. या काव्यात्मकतेनेच त्यांची कथा सुंदर झाली आहे. अनुभूती आणि अभिव्यक्ती या दोन्ही बाबतीत ते मुळापासूनच संपन्न आहेत.




आपल्या आसपास असलेले भीषण वास्तव आपण दिसत असूनही टाळू पहातो. त्या वास्तवाच्या अंतरंगात शिरून मनाची पकड घेणारी त्यांची लेखन शैली प्रक्षोभकारक उपमा देऊन कथेतले भाव तीव्र करते. ते सामर्थ्य अनुभवण्यासाठी रसिक वाचकांनी हा कथासंग्रह जरूर वाचावा.

## गोकर्णीची फुले : वि. स. खांडेकर


जगात साऱ्याच फुलांना गुलाबाचा रंग आणि बकुळीचा सुगंध कुठून मिळणार? साहित्यातही हाच अनुभव येतो. गोकर्णीच्या फुलाला वास नसला तरी ते सौम्य संमिश्र रंग थोडफार आल्हाददायक आणि आकर्षक वाटतातच.



वाड्मयाप्रमाणे व्यक्तिंच्याही बाबतीत रसग्रहणाची फार आवश्यकता आहे. असा विचार करून लेखकाने तीन भागात विविध व्यक्तिरेखा रेखाटल्या आहेत. काही सामान्य व्यक्तिरेखा असल्या तरी लेखकाला त्या जगात मोठ्या मानल्या जाणाऱ्या अनेक माणसांपेक्षा मोठ्या वाटतात. दुसऱ्या भागात कोल्हटकरांच्या नाटकांचे सांगोपांग अप्रतिम रसग्रहण आहे. 'उषःप्रभा' हा कथासंग्रह व 'मराठी चित्रकथा' यांचे गुणग्राहक रसग्रहण आहे. हे पुस्तक रसिक वाचकांनी जरूर वाचावे. यातून वि. स. खांडेकरांची विद्वत्ता, चिकित्सक, सखोल अभ्यासाचे आणि अनुभवाचे प्रतिबिंब दिसते.

## सार्थ : एस. एल. भैरप्पा


भारतीय कीर्तीचे सिद्धहस्त लेखक एस. एल. भैरप्पा यांची उमा कुलकर्णी यांनी भाषांतर केलेली अनेक पुस्तके प्रसिद्ध आहेत. भैरप्पांची सर्वच पुस्तके पुन्हा पुन्हा वाचावी अशीच आहेत. त्यांतील 'सार्थ' हे पुस्तक वेगळाच अनुभव देणारे आहे. लेखकाच्या ऐतिहासिक, पौराणिक विषयांवरील पुस्तकांत 'सार्थ' ही कादंबरी मध्ययुगीन भारतातील जीवनशैलीच्या अद्भूत अनुभवामध्ये आपल्याला घेऊन जाते. सार्थ म्हणजे व्यापाऱ्यांचा तांडा.



अशा तांड्याबरोबर देशांतराला निघालेल्या नागभट्टाबरोबर वाचक सातव्या-आठव्या शतकातील जीवनानुभवात रमून जातो. त्याकाळातील धर्म-पंथ यामधील तात्त्विक भेद, धार्मिक व सामाजिक प्रश्न यांवर अत्यंत सर्जनशीलतेने लेखकाने वर्णन केले आहे. मनुष्यस्वभावाचे पैलू उलगडणारी ही कादंबरी वाचकांनी अवर्जून वाचावी अशी आहे.

## बर्फाचे वादळ आणि चहाच्या वाफा : राजू कोण्णूर

'वसुधैव कुटुंबकम्' मनात ठेवून बालपण आणि तरुणपणातले ५० वर्षांपूर्वीचे संस्कार घेऊन जगाच्या तीन खंडात वास्तव्य करून आता कॅनडात स्थित झालेल्या राजू कोण्णूरांचे हे पुस्तक. ते रोजची बोलीभाषा मराठी नसताना सुंदर पद्धतीने मराठी भाषेत लेखन करतात. नजरेने टिपलेले, अनुभवलेले रोजच्या जगण्यातील छोटे छोटे प्रसंग त्यांच्या लेखनाचे विषय आहेत. मिश्किलपण हा त्यांच्या लेखनाचा स्थायी भाव आहे. या पुस्तकातील विनोदी लेख, एकांकिका, प्रासंगिक लेख वाचकाला निखळ आनंद देतात. परदेशात वास्तव्य असूनही जन्मभर पुणेकर राहिलेल्या, मराठीचा अभिमान बाळगणाऱ्या लेखकाचे पुणेकरी भाषा शैलीतले हे पुस्तक वाचकांनी जरूर वाचावे.





## निवडक



### पूजा लाड 'सहकार भारती'च्या सहप्रमुखपदी

**नवी मुंबई** : सहकार भारती संघटनेच्या नवी मुंबई जिल्हा महिला सहप्रमुखपदी पूजा लाड यांची निवड करण्यात आली. सहकार भारतीचे महाराष्ट्र प्रदेश महामंत्री विवेक जुगादे यांच्या हस्ते लाड यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. सहकार भारतीद्वारे महिलांना स्वावलंबी बनविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे लाड यांनी सांगितले, तसेच त्यांनी प्रमोद जोशी, चंद्रकांत निकम, रमाकांत म्हात्रे, मिसाळ यांचे आभार मानले.

### चारचाकीसाठी नोंदणी क्रमांक उपलब्ध

**नवी मुंबई** : पनवेलच्या प्रादेशिक परिवहन कार्यालयामध्ये खासगी चारचाकी मोटार वाहनांच्या नवीन नोंदणीसाठी एमएच ४६ सीएच ही नवीन मालिका लवकरच सुरू होत आहे. या मालिकेतील नोंदणी क्रमांक राखीव करायचे असल्यास नागरिकांनी कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत पनवेलच्या प्रादेशिक परिवहन कार्यालयात संपर्क साधावा. एकाच नोंदणी क्रमांकासाठी एकापेक्षा जास्त अर्जदारांनी अर्ज केल्यास नमूद तरतुदीनुसार नोंदणी क्रमांकासाठी जाहीर लिलाव केला जाणार आहे.

## केरळच्या अधिकाऱ्यांची नवी मुंबई मनपाला भेट

### प्रकल्प, कामांचे केले कौतुक

**नवी मुंबई : बातमीदार**

विविध नावीन्यपूर्ण प्रकल्प व वैशिष्ट्यपूर्ण उपक्रमांमुळे नवी मुंबई हे देशातील वेगळे शहर म्हणून नावाजले जात आहे. त्या अनुषंगाने विविध राज्यातील तसेच देशांतील पदाधिकारी, अधिकारी नवी मुंबई महापालिकेस भेटी देत असतात. अशाच प्रकारे केरळ राज्य शासनाच्या प्रशासकिय प्रशिक्षण संस्थेमार्फत २१ प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांच्या समुहाने नवी मुंबईस भेट देऊन विविध उल्लेखनीय कामांची माहिती जाणून घेतली, तसेच काही प्रकल्पस्थळी प्रत्यक्ष भेटी दिल्या.



महापालिका मुख्यालयात प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांचे ग्रंथभेट देऊन स्वागत करण्यात आले. या वेळी अतिरिक्त शहर अभियंता शिरीष आरदवाड यांनी महानगरपालिकेच्या वाटचालीविषयी व प्रकल्प, कामांविषयी सादरीकरणाद्वारे सविस्तर माहिती दिली.

कार्यकारी अभियंता अजय संख्ये यांनी या सर्व अतिथी अधिकाऱ्यांना मुख्यालयातील विविध सुविधांची प्रत्यक्ष पाहणीमध्ये माहिती दिली व सर्वसाधारण सभेच्या राजमाता जिजाऊ सभागृहातील व्यवस्थेचीही माहिती दिली. या अधिकारी समुहाने कोपरखैरणे येथील अत्याधुनिक मलप्रक्रिया केंद्र तसेच टर्शिअरी ट्रिटमेंट प्लांटला भेट देऊन बारकाईने जलशुद्धीकरण प्रक्रियेची माहिती जाणून घेतली. पुनर्प्रक्रियाकृत पाण्याचा वापर उद्योग समुहांना करण्यात येत आहे या वैशिष्ट्याबद्दल उत्कंठा प्रदर्शित करीत या समुहाने या संपूर्ण प्रक्रियेची बारकाईने माहिती घेतली.

नवी मुंबई महानगरपालिकेचे मुख्यालय हे ग्रीन बिल्डींग मानांकनाला साजेसे असून त्याची भव्यता, स्वच्छता आणि नीटनेटकेपणा याचे विशेष कौतुक या समुहाने केले. नवी मुंबई हे अधिक आधुनिक व उत्तम शहर असून नवी मुंबईकरांच्या अतिथ्यशीलतेने आम्ही भारावून गेलो असल्याचे मत या अधिकारी समुहाने नोंदविले.

## नेरूळच्या 'एसआयईएस'मध्ये अभिव्यक्ती कार्यक्रम उत्साहात

**नवी मुंबई : बातमीदार**

एसआयईएसमध्ये कॉलेज नेरुळ येथे मीडियम फाउंडेशन, शब्द फाउंडेशन आणि हिंदी परिषद यांच्या वतीने अभिव्यक्ती मंगळवारी (दि. १८) कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून गृह मंत्रालयाच्या राजभाषा विभागाचे उपसंचालक डॉ. विश्वनाथ झा माजी उपसंचालक, प्रसिद्ध गझलकार विशेष अतिथी दीक्षित डनकौरी, चित्रपट गीतकार आणि संगीतकार विनोद दुबे उपस्थित होते.

निमंत्रित कवी व कवयित्रींपैकी विशाल बाग, कवी सिद्धार्थ, कवी प्रज्ञा विकास शांडिल्य, संतोष सिंग, अधिवक्ता राजीव मिश्रा आणि डॉ. प्रज्ञा शर्मा यांनी आपल्या सादरीकरणाने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. या वेळी विविध स्पर्धेतील १२ विजेत्यांना शब्द व ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले. माध्यम प्रतिष्ठान व प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. विजेत्या विद्यार्थ्यांपैकी अंजली पांचू कांडू, सृष्टी कित्तुरे आणि तनिष्का जोशी यांनी आपल्या सादरीकरणाने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

या वेळी मराठी अभिनेत्री शीतल पाठक आणि गायक प्रणय बनसोडे डॉ. ममता झा, सुनीता चौहान, मनीषा सिंग, लता जोशी, डॉ. जे. जी. मोरे, प्रो. अनिल आठवले, डॉ. आशा द्विवेदी, डॉ. अंजनी कुमार द्विवेदी, डॉ. पूजा आलापुरिया, डॉ. मृदुला कातकडे, डॉ. कनकलता तिवारी, बिट्टू जैन, कविता सिंह, विक्रांत सिंह, साहित्यकार अमर त्रिपाठी, रवि यादव, रितेश चंद्रमोहन, सैयद हिना कौसर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या शेवटी परिषद अध्यक्षा सुनीता अंभोरे यांनी आभार मानले.



## 'नुकसानग्रस्तांनी ७२ तासांच्या आत माहिती कळविणे आवश्यक'

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

कोकण विभागात होणारा सततचा अवकाळी पाऊस, अतिवृष्टीमुळे या विभागातील नुकसानग्रस्त विमाधारक शेतकऱ्यांनी त्यांच्या सर्वे नंबरनुसार बाधित पिक व क्षेत्राबाबत नुकसानाची माहिती घटना घडल्यापासून ७२ तासांच्या आत संबंधित विमा कंपनीस कळविणे आवश्यक असल्याचे कोकण विभागीय कृषी सहसंचालक यांनी कळविले आहे.

कोकण विभागातील रायगड व पालघर जिल्ह्यात प्रधानमंत्री पिक विमा योजना ही भारतीय कृषी विमा कंपनी तर ठाणे, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यात युनायटेड इंडिया इन्शुरन्स कं. लि. या विमा कंपन्याकडून राबविण्यात येत आहे. कोकण विभागात सध्या भात, नाचणी व उडीद पिकांच्या कापणीला सुरुवात झाली असून सततचा अवकाळी पाऊस, अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान होऊ शकते. पिक नुकसानीबाबतची पूर्वसूचना केंद्र शासनाने विकसित केलेल्या Crop Insurance app किंवा विमा कंपनीचा टोल फ्री क्रमांक, विमा कंपनीचे जिल्हा व तालुका स्तरावरील कार्यालये, विमा कंपनीचा ई-मेल, संबंधित बँक किंवा कृषी/ महसूल विभाग याद्वारे देण्यात यावी. रायगड व पालघर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी भारतीय कृषी विमा कंपनी (टोल फ्री क्र.१८००४१९५००४) तर ठाणे, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयासाठी युनायटेड इंडिया इन्शुरन्स कं. लि (टोल फ्री १८००२३३५५५५) या विमा कंपन्याच्या टोल फ्री क्रमांकाचा वापर करावा.

पीक कापणी करून सुकण्यासाठी ठेवलेले असताना कापणीपासून जास्तीत जास्त दोन आठवड्यापर्यंत गारपीट, चक्रीवादळ, चक्रीवादळामुळे पडलेला पाऊस व अवकाळी पाऊस यापैकी जे कारण असेल ते नमूद करून नुकसानीची माहिती देणे आवश्यक आहे.

शेतकऱ्यांनी नुकसान भरपाईसाठी तक्रार नोंदवताना योग्य ती खबरदारी घेऊनच नुकसानग्रस्त क्षेत्राची नुकसान पूर्वसूचना विहित कालावधीत नोंदवावी, असे आवाहन कोकण विभागाचे विभागीय कृषी सहसंचालक अंकुश माने यांच्याकडून करण्यात येत आहे.

## एक पणती सैनिकासाठी! रसायनीत उपक्रम

**रसायनी : प्रतिनिधी**

लक्ष्य फाउंडेशनच्या संस्थापिका अनुराधा प्रभुदेसाई यांच्या संकल्पनेतून साकार झालेल्या प्रत्येक सैनिक एक पणती हा उपक्रम रसायनीत शुक्रवारी (दि. २१) प्रिआ स्कूलमध्ये झाला. सैनिकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी दरवर्षी दिवाळीत हा कार्यक्रम केला जातो.



या कार्यक्रमासाठी विशेष पाहुणे म्हणून पुण्याहून निवृत्त कर्नल शरदचंद्र पाटील यांनी उपस्थित राहून सियाचिनचे युद्धानुभव उपस्थितांसमोर मांडले, तसेच सैनिकांच्या खडतर आणि थरारक जीवनाची ओळख करून दिली.

प्रचंड थंडीत हिमपात, बर्फाची वादळे, तिथल्या निसर्गामध्ये होणारे सैनिकांचे मृत्यू, तिथले वातावरण, अशा प्रत्यक्ष अनुभवलेल्या थरारक प्रसंगांचे वर्णन दृकश्राव्य माध्यमातून सादर केले. त्यानंतर प्रिआ स्कूलच्या पटांगणात ५०० पणत्या लावून ही मानवंदना देण्यात आली. या वेळी परिसरातील अनेक उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विनोद सहस्त्रबुद्धे, प्रकाश कुलकर्णी, नागेश कदम, अनिल कणेरे, अनंत भालेराव, सुरेंद्र पावसकर, रवी ओंकार, बिना रेगे, वसुधा सहस्त्रबुद्धे या लक्ष्य फाउंडेशन आणि प्रेरणा फॅमिली कट्टाच्या सभासदांनी प्रयत्न केले.

## कळंबोली ज्ञानमंदिर शाळेत पर्यावरणपूरक किल्ले स्पर्धा



**कळंबोली : प्रतिनिधी**

कळंबोलीतील म. ए. सो. ज्ञानमंदिर विद्यालयात पर्यावरणपूरक किल्ले बनविणे स्पर्धेचे गुरुवारी (दि. २०) आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेत १८ गटांत २२० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

विद्यार्थ्यांनी स्वतः किल्ले बनविण्याचा अनुभव घेतला. विशेष गोष्ट म्हणजे किल्ले बनविताना प्लास्टिक, थर्माकोलचा वापर केला नाही. किल्ले बनविताना प्रत्यक्ष त्या किल्ल्यांचा मुलांनी अभ्यास केला होता. या स्पर्धेस प्रमुख पाहुणे व परीक्षक म्हणून उद्योजक गोरक्षनाथ गायकवाड, तेजल केमिकल तळोजा व दादासाहेब लिमये महाविद्यालयाचे डॉ. बबन जाधव हे लाभले. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या किल्ल्यांचे कौतुक करीत प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. या कार्यक्रमास मुख्याध्यापिका प्रियांका फडके (पूर्व प्राथमिक), संजना बाईत (प्राथमिक), रोहिणी गायकवाड (माध्यमिक) उपस्थित होत्या. स्पर्धेस शाळा समिती अध्यक्ष देवदत्त भिशीकर व डॉ. गोविंद कुलकर्णी यांचे मार्गदर्शन लाभले.

# द्रुतगती मार्गावर तीन तास वाहतूक ठप्प





## ऐन दिवाळीत प्रवाशांची झाली कोंडी

**खालापूर : प्रतिनिधी**

दिवाळीनिमित्ताने सलग पाच सुट्या लागल्याने शनिवारी (दि. २२) मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर पर्यटकांच्या वाहनांची गर्दी झाली होती. वाहनांची वाढती संख्या लक्षात घेऊन महामार्ग पोलिसांनी खालापूर टोलनाक्याजवळ अवजड वाहनांना पुणे लेनवर रोखून धरले. त्यामुळे खालापूर हद्दीत द्रुतगती मार्गावर वाहनांच्या पाच किमी लांब रांगा लागल्या होत्या. या वाहतूक कोंडीमुळे ऐन दिवाळीत प्रवाशांच्या उत्साहावर विरजण पडले.

शनिवारी धनत्रयोदशी, रविवारी साप्ताहिक सुट्टी, सोमवारी लक्ष्मीपूजन, बुधवारी बलीप्रतिपदा, दिपावली पाडवा, भाऊबीज अशा सलग पाच दिवस सुट्या आहेत. तसेच गुरुवारी मुस्लिम रबिलाखर मासारंभ आहे. या सलग सुट्यांमुळे मुंबई, ठाणे, नवी मुंबई, कल्याण परिसरातील नागरिकांनी मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाने पश्चिम महाराष्ट्र जेजुरी, पंढरपूर, कोल्हापूर, सोलापूर, अक्कलकोट व गोवा आदी पर्यटनस्थळी जाण्याचा बेत आखला. त्यानुसार शनिवारी सकाळी ते पर्यटनासाठी निघाले. त्यामुळे द्रुतगती मार्गावर वाहनांची मोठी गर्दी झाली. अशा वेळी अपघात होऊ नये, यासाठी महामार्ग पोलिसांकडून अवजड वाहनांना तीन तास (गोल्डन आवर्स) बंदी घालण्यात येते. त्याप्रमाणे महामार्ग पोलिसांनी शनिवारी सकाळी ८.४० ते दुपारी ११.४५ असा गोल्डन आवर्स घेऊन खालापूर टोलनाक्यापासून अर्धा किमी अंतरावर पुणे लेनवर अवजड वाहनांना रोखून धरले, मात्र हलक्या व लहान वाहनांना सोडण्यात येत होते. तरीही तीन तासांच्या गोल्डन आवर्समध्ये खालापूर टोल नाका ते कुंभीवली गावाची हद्द अशी पाच किमी अंतरावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या.

दरम्यान, खालापूर टोलनाक्यावरुन वाहनांना विनाटोल सोडून देण्यात येत होते. गोल्डन आवर्स संपताच सर्वच वाहने टोल फ्री केल्याने अवघ्या २५ मिनिटात द्रुतगती मार्गावरील वाहतूक कोंडी दूर होऊन पुणे लेन वाहतुकीसाठी मोकळी झाली होती.

याच वेळेत पुण्याकडून मुंबईकडे जाणाऱ्या मुंबई लेनवर मोठ्या संख्येने वाहने आल्याने टोल नाक्यावर वाहतूक ठप्प झाली होती. तेथेही टोल फ्री केल्याने काही वेळातच मुंबईकडे जाणारी वाहतूकही सुरळीत झाल्याचे खालापूर सावरोली टोलनाका प्रमुख अधिकारी बाळासाहेब लांडगे यांनी सांगितले.

# म्हसळ्यातील वाहतूक कोंडी झाली नित्याचीच समस्या

**म्हसळा : प्रतिनिधी**

अरूंद रस्ते, वाढलेली वाहने आणि बेशिस्त पार्किंग यामुळे म्हसळा शहरात नेहमी वाहतूक कोंडी होत असते. स्थानिक त्यामुळे पादचारी, विशेषत: ज्येष्ठ नागरिक, महिला आणि मुलांना शहरातील मुख्य रस्त्यावर व बाजारांत चालणेही अवघड झाले आहे.

म्हसळा शहरातील वाहतूक कोंडीची समस्या ही आता सोडविण्यापलिकडची झाली आहे. दिघी पोर्टच्या अवजड वाहनांमुळे म्हसळा शहरात वाहतूक कोंडी होते, असे स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे. तर या वाहतूक कोंडीला म्हसळा नगरपंचायतसुद्धा जबाबदार असल्याचे जाणकार सांगतात.

श्रीवर्धन, श्रीक्षेत्र हरिहरेश्वर, दिवेआगर सुवर्ण गणेश मंदिर, आंतरराष्ट्रीय दर्जाचे दिघीबंदर, तुरूंबाडी येथील दास प्रकल्प येथे जाणारी सर्व छोटी वाहने म्हसळा शहरातून जाणे पसंत करतात, जीपीएस प्रणालीही याच मार्गाबाबत मार्गदर्शन करते. आधीच अरूंद असलेल्या या रस्त्यावर बायपास मार्गावरून येणाऱ्या-जाणाऱ्या वाहनांनी दिघी नाक्यावर गर्दी केली की, त्याचा परिणाम म्हसळा शहरातील वाहतुकीवर होतो.

पंचविस वर्षांपुर्वी शहरातील मुख्य आणि अंर्तगत रस्त्यांवर काही भागात बाजारपेठ होती. आता मुख्य रस्त्यावरील बाजारपेठ वसंतराव नाईक कॉलेज फाटा ते दिघी नाका, दिघी नाका ते न्यू इंग्लीश स्कूल आणि दिघी नाका ते खारगाव (खुर्द) स्टँड अशा भागात बाजारपेठ वाढली आहे. त्याच बरोबर फेरीवाले, रिक्षांचे थांबे, माल वाहतुकीची साधने यांच्या संख्येत प्रचंड वाढ झाली आहे. अनधिकृत पार्कींग, मोकाट गुरे व कुत्र्यांचा मुक्त संचार, या सर्वांचा ताण तुलनेत कमी संख्येने असलेल्या पोलिसांवर पडत आहे.

दरम्यान, वाहतूक व्यवस्थेतीत विविध संघटना (एसटी, रिक्षा, जिप, ट्रव्हलर्स, व्यापारी, पदपथावरील व्यापारी) यांच्या प्रतिनिधींशी सविस्तर चर्चा, सुसंवाद करून म्हसळ्यातील सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीपान सोनावणे यांनी समुपदेशन केले. तरीही वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्याबद्दल गेल्या ३-४ दिवसात एक ट्रक आणि पाच रिक्षांवर दंडात्मक कारवाई केल्याची माहिती सोनावणे यांनी दिली.

**म्हसळा ग्रामपंचायतीचे रुपांतर नगरपंचायतीध्ये झाल्यानंतर विविध कर वसुली जेवढ्या तत्परतेने केली जाते, तेवढ्या तत्परतेने शहरांतील नागरिक, व्यापारी, वाहने आणि खरेदीदारांसाठी सोयी-सवलती उपलब्ध करुन देणे हे नगरपंचायत प्रशासनाचे कर्तव्य आहे.**

**-फारूकभाई, नागरिक, म्हसळा**

**शहरातील सार्वजनिक वाहतुकीला शिस्त लावण्यासाठी बेशिस्त वाहन चालकांवर कठोर कारवाई करणार**

**-संदीपान सोनावणे, सहाय्यक पोलीस निरीक्षक, म्हसळा**

# तिवरे ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी संतोष भासे



**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्यातील तिवरे ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी बाळासाहेबांची शिवसेना (शिंदे गट) पक्षाचे संतोष रघुनाथ भासे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. चित्रा भासे यांनी राजीनामा दिल्याने हे उपसरपंच पद रिक्त झाले होते.

सरपंच चंद्राबाई पुंडलिक वळवे यांच्या अध्यक्षतेखाली तिवरे ग्रामपंचायत कार्यालयात उपसरपंच निवडीसाठी विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होते. ग्रामपंचायत सदस्य संजय तिखंडे, चित्रा भासे, अपर्णा दगडे, उज्वला ठाकरे, जनाबाई पवार, सुजाता दाभणे, सुश्मिता जाधव, अनिल पवार, गुरुनाथ दगडे, प्रमोद ठाकरे, स्वाती घरत आणि ग्रामसेवक सुभाष पवार, या विशेष सभेला उपस्थित होते. उपसरपंच पदासाठी संतोष भासे यांचा एकमेव उमेदवारी अर्ज दाखल झाल्याने ते बिनविरोध निवडून आल्याचे जाहीर करण्यात आले.

नवनिर्वाचित उपसरपंच संतोष भासे यांचे आमदार महेंद्र थोरवे यांनी अभिनंदन केले. या वेळी बाळासाहेबांची शिवसेना (शिंदे गट) पक्षाचे कर्जत विधानसभा मतदारसंघ संघटक शिवराम बदे, नगरसेवक संकेत भासे, वरई ग्रामपंचायतीचे सरपंच सुरेश फराट, अरुण देशमुख, भालचंद्र घोडविंदे, जितेंद्र भासे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 'घनकचरा व्यवस्थापन, मैला व्यवस्थापनास प्राधान्य देणार'

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषद स्वच्छतेवर लक्ष देणार आहे. आगामी काळात जिल्ह्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये घंटागाडी देण्याचे आमचे उद्दिष्ट आहे. घनकचरा व्यवस्थापन व मैला व्यवस्थापन यांना प्राधान्य देण्यात येईल, अशी माहिती रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी शुक्रवारी (दि. २१) पत्रकार परिषदेत दिली.



डॉ. किरण पाटील शुक्रवारी पत्रकारांशी बोलत होते. पाणी व स्वच्छता विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी शुभांगी नाखले या वेळी उपस्थित होत्या. डॉ. किरण पाटील यांनी यावेळी संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियाना अंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या स्पर्धेची माहिती दिली.

नागरिकांनी स्वच्छतेच्या सवयी अंगीकारून ग्रामीण भागातील जनतेचे आरोग्यमान, जीवनस्तर उंचावण्यासाठी ग्रामस्थांच्या सक्रिय व सातत्यपूर्ण सहभागातून संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान पुन्हा अधिक जोमाने राबविण्यात येणार असून यामध्ये विशेष कामगिरी करणाऱ्या ग्रामपंचायती, जिल्हा ते ग्रामपंचायत स्तरावरील अधिकारी व कर्मचारी यांचा सन्मान केला जाणार आहे, असे डॉ. पाटील यांनी या वेळी सांगितले.

राज्याच्या पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाने नुकतेच संत गाडगे ग्राम स्वच्छता अभियानाबाबत शासन निर्णयाद्वारे मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत.त्यानुसार या अभियानाला ११ऑक्टोबरपासून सुरुवात झाली असून, ते १५ नोव्हेंबरपर्यंत जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतीमध्ये राबविण्यात येणार आहे.

जिल्ह्यात स्वच्छतेच्या विविध पैलूतील प्रगतीबाबत सर्वसमावेशक स्पर्धा राबवून त्यामाध्यमातून ग्रामस्थांना प्रोत्साहित करून स्वच्छतेच्या कार्यक्रमातील आपलेपणा व महत्व पटवून देण्याकरीता जिल्ह्यात संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान राबविण्यात येत आहे. गावात शाश्वत स्वच्छतेच्या या महायज्ञात सर्व ग्रामपंचायती, नागरिक, गाव व तालुकास्तरीय कर्मचारी व अधिकारी तसेच लोकप्रतिनिधींनी सक्रीय सहभाग घ्यावा, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी या वेळी केले.

संबधित वर्षात बांधण्यात आलेली वैयक्तिक शौचालय संख्या, शौचालयाचे रेट्रोफिटिंग, वैयक्तिक शौचालय बांधकाम प्रोत्साहन अनुदान वाटप, घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन अंतर्गत कामे संख्या, मैला गाळ व्यवस्थापन अंतर्गत कामे, जिल्ह्यात व तालुक्यात सर्व गावात कचरा विलगीकरण असणे, हागणदारी मुक्त अधिक (ओडीएफ प्लस) गावांची घोषणा करणे, संपूर्ण जिल्ह्यात व तालुक्यात प्लास्टिक कचरा संकलन/वर्गीकरण व व्यवस्थापन या उपक्रमामध्ये सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या ग्रामसेवक ते जिल्ह्यांपर्यतच्या अधिकारी व कर्मचारी यांना प्रशस्तीपत्रक व मानचिन्ह देवून राज्यस्तरावर गौरविण्यात येणार आहे, अशी माहिती पाणी व स्वच्छता विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी शुभांगी नाखले यांनी दिली.

# यंदा हमीभाव भातखरेदी केंद्र लवकर सुरू होणार

**अलिबाग : प्रतिनिधी**

कृषी विभागाच्या प्रयत्नांमुळे यंदा रायगड जिल्ह्यात भाताची उत्पादकता वाढणार असल्याचा अंदाज व्यक्त होत आहे. त्यादृष्टीने शेतकऱ्यांना हमीभाव केंद्रांवर भात विकणे सुलभ जावे, यासाठी मार्केटींग फेडरेशनने सर्व तयारी पूर्ण केली आहे. शेतकऱ्यांचे नुकसान टाळण्यासाठी यंदा लवकर खरेदी केंद्र सुरू करण्याचा पणन विभागाचा मानस आहे. नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात हमीभाव भात खरेदी केंद्र सुरू होतील, असा अंदाज आहे.

यावर्षीचा भातकापणीचा हंगाम आताच सुरू झाला आहे. शासनाने भाताची आधारभूत किंमत यापूर्वीच जाहीर केली आहे. किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत सर्वसाधारण भातासाठी दोन हजार ४० रुपये प्रति क्विंटल दर जाहीर झाला आहे. हा दर मागील वर्षापेक्षा १०० रुपयांने वाढीव असल्याने शेतकऱ्यांमध्ये समाधानाची भावना आहे. यंदा रायगड जिल्ह्यातील भातशेती समाधानकारक आहे. मात्र परतीच्या पावसाने काही ठिकाणी भातपिकांचे नुकसान झाले आहे. भात भिजल्याने त्याला भाव मिळणार नाही, याचीही चिंता शेतकऱ्यांना सतावत आहे.

मागील हंगामात रायगड जिल्ह्यात एकूण २५ हजार ८३२ शेतकऱ्यांकडून पाच लाख ४९ हजार २७९.६४ क्विंटल इतकी धान खरेदी झाली आहे. त्यात यंदाच्या खरीप हंगामात वाढ व्हावी, यासाठी प्रयत्न सुरु आहेत. आधारभूत किंमतीचा शेतकऱ्यांना लाभ होण्याच्या दृष्टीने व त्यांना हमीभावापेक्षा कमी किंमतीने धान्य विकावे लागू नये, यासाठी राज्य शासनाने खरेदी केंद्र सुरु केली आहेत. जिल्ह्यात सुमारे एक लाख हेक्टर क्षेत्रावर भाताची लागवड करण्यात आली आहे. यंदा पाऊस समाधानकारक पडला शिवाय पूर, अतिवृष्टी यांचे प्रमाण खूपच कमी होते. त्यामुळे पिकांची वाढ चांगली झाली. त्यातच कृषी विभागाकडून शेतकऱ्यांची प्रति एकरी उत्पादक क्षमता वाढवण्यासाठी प्रयत्न करण्यात आले आणि त्याला यश मिळाल्याचे दिसून येत आहे.

दरवर्षी भात खरेदी केंद्र उशिरा सुरू होत असल्याने शेतकऱ्यांना बाजारात कमी दराने भात विकावे लागत होते. यात शेतकऱ्यांना मोठ्या नुकसानीला सामोरे जावे लागत होते. ही बाब लक्षात घेवून या वेळी जिल्ह्यात नोव्हेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात ही केंद्र सुरू करण्याचा प्रशासनाचा मानस आहे. भात खरेदी केंद्रावर ओघ वाढत चालल्याने अधिकच्या भात साठवणुकीसाठी शासनातर्फे यापूर्वी असलेली वडखळ, नेरळ, कर्जत येथील गोदामांव्यतिरिक्त महाड, रोहा तालुक्यातील मेढा या ठिकाणी खरेदी केलेले अधिकचे धान्य साठवणुकीसाठी तातडीने गोदामे उपलब्ध करुन दिली.

भात कापणीला सुरूवात झाली असल्याने मळणी काढल्यानंतर तत्काळ भाताची विक्री करणे शेतकऱ्यांना सोयीचे होणार आहे. भात खरेदीसाठी केंद्रांना मंजुऱ्या देणे, गोदामांची डागडुजी, भात भरडाई करणाऱ्या मिलर्सचे करार वाढवणे, अशी कामे पणन महामंडळाकडून करण्यात आली आहेत.




**रायगड जिल्ह्यात सर्वसाधारण भाताचीच खरेदी केली जाते. भात खरेदीसाठी आमची पूर्वतयारी जवळपास पूर्ण झाली आहे. योग्य हमीभाव मिळू लागल्याने जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा कल शासनाला भात विकण्याकडे वाढू लागला आहे. यंदा सरासरी भात उत्पादकता वाढण्याचा अंदाज कृषी विभागाने व्यक्त केलेला असल्याने भाताच्या विक्रीला शेतकऱ्यांकडून चांगला प्रतिसाद मिळण्याचा आशा आहे. नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात खरेदी केंद्र सुरू करण्याचा प्रयत्न आहे.**

**-केशव ताटे, जिल्हा मार्केटींग अधिकारी,रायगड**

# जिल्हा उद्योग केंद्राच्या माध्यमातून दिव्यांगांना करणार आत्मनिर्भर

- महाव्यवस्थापक जी. एस. हरळय्या यांचे प्रतिपादन
- अलिबागमध्ये दिव्यांगांकरिता उद्योजकता विकास प्रशिक्षण शिबिर

**अलिबाग : जिमाका**

भारतीय उद्योजकता विकास संस्था, टाटा कम्युनिकेशन्स लिमिटेड आणि जिल्हा उद्योग केंद्राच्या माध्यमातून दिव्यांगांना आत्मनिर्भर करणार असल्याचे प्रतिपादन जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक जी. एस.हरळय्या यांनी मंगळवारी अलिबाग येथे केले.

भारतीय उद्योजकता विकास संस्था (ईडीआयआय), टाटा कम्युनिकेशन्स लिमिटेड-मुंबई आणि रायगड जिल्हा उद्योग केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने अलिबाग येथे दिव्यांगांकरिता एक महिना कालावधीचा उद्योजकता विकास प्रशिक्षण शिबिर घेण्यात आले. या प्रशिक्षण कार्यक्रमाचा प्रमाणपत्र वितरण कार्यक्रम मंगळवारी अलिबागेतील जिल्हा उद्योग केंद्र सभागृहात झाला. त्यावेळी जी. एस. हरळय्या बोलत होते. या वेळी प्रशिक्षणार्थींनी उत्स्फूर्तपणे आपले मनोगत व्यक्त केले.



या शिबिरात व्यवसायाच्या विविध संधींची ओळख, संवाद कौशल्य, उद्योजकीय व्यक्तिमत्व विकास, शासकीय कर्ज योजनांची माहिती, प्रकल्प अहवाल तयार करणे, क्षेत्र भेट, बाजारपेठ सर्वेक्षण, डिजिटल मार्केटिंग, मार्केटिंग कौशल्य अशा विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले.

प्रमाणपत्र वितरण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ईडीआयआयचे प्रकल्प अधिकारी शशिकांत दनोरीकर यांनी केले. बँक ऑफ इंडियाचे जिल्हा प्रबंधक विजयकुमार कुलकर्णी, टाटा कम्युनिकेशन्स लिमिटेडच्या सामाजिक दायित्व विभाग प्रमुख पल्लवी बरुआ, सामाजिक दायित्व विभाग व्यवस्थापक संगीता पाध्ये, जॉन डिसुझा यांच्यासह प्रशिक्षणार्थी या वेळी उपस्थित होते. ईडीआयआयचे प्रकल्प संचालक डॉ. प्रकाश सोळंकी यांनी आभार मानले.

# किल्ले बनविण्याच्या हौसेवर परतीच्या पावसाचे पाणी; बालमावळे हिरमुसले

**खोपोली : प्रतिनिधी**

परतीच्या पावसाच्या वाढलेला मुक्कामामुळे बच्चे कंपनीच्या किल्ले बनविण्याच्या हौसेवर पाणी फिरले आहे. पावसाच्या रोजच्या हजेरीमुळे किल्ले बनविण्याच्या कामात अडथळा निर्माण होत असल्याने बाल मावळे नाराज झाले आहेत.



दसऱ्यानंतर परतीचा पाऊस येणार नाही, असा अंदाज होता. मात्र दिवाळी सुरू झाली, तरी पाऊस थांबण्याचे नाव घेत नाही. शेतात भाताच पीक कापणीला आल असून, शाळांना दिवाळीची सुटी लागली आहे. या सुटीत मुले हौसेने मातीचे किल्ले तयार करतात. पाऊस सुटी घेत नसल्याने त्यांचा हिरमोड होत आहे.

खालापूर, चौक भागात दरवर्षी किल्ले स्पर्धा असल्याने मुलांना विशेष हुरूप असतो. शहरी भागात सोसायटीच्या आवारात तर ग्रामीण भागात आजही घरासमोर अंगणात मातीचा किल्ला बनवण्याची आवड जपली जात आहे. तयार किल्ले जरी बाजारात विक्रीला असले तरी स्वतः माती कालवून मेहनतीने किल्ला करण्याची मजा मुले घेतात. दगड. विटांचे तुकडे जमा करून किल्ला तयार करण्यात तासन तास तहान-भूक विसरून गुंग होवून जातात. किल्ला तयार झाल्यानंतर सजावटीसाठी मातीचे सैन्य, मावळे याची खरेदी असते. परंतु यंदा पावसाने किल्ला तयार करण्यात अडचणी येत असल्याने मातीची खेळणी, मावळे बाजारात विक्रीसाठी कमी प्रमाणात दिसत आहेत.

# गतविजेत्या ऑस्ट्रेलियाचा पराभव



## टी-२० वर्ल्डकपमध्ये न्यूझीलंडची दणदणीत सलामी

**सिडनी : वृत्तसंस्था**

**टी-२० विश्वचषक स्पर्धेच्या सुपर १२ फेरीतील पहिल्याच सामन्यात न्यूझीलंडने यजमान ऑस्ट्रेलियाला पाणी पाजले. न्यूझीलंडने तब्बल ८९ धावांनी सामना जिंकत वर्ल्डकपची विजयी सुरुवात केली. डेवॉन कॉनवॉयच्या नाबाद ९२ धावांच्या जोरावर न्यूझीलंडने २० षटकांत तीन बाद २०० धावा केल्या होत्या. ऑस्ट्रेलियाचा संपूर्ण डाव १११ धावात गुंडळला गेला.**

मोठ्या आव्हानाचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाची सुरुवात खराब झाली. धडाकेबाज सलामीवीर डेव्हिड वॉर्नर अवघ्या पाच धावा करून बाद झाला. टीम साऊदीने त्याचा त्रिफळा उडविला. न्यूझीलंडने चेंडू थांबून येणाऱ्या खेळपट्टीचा पॉवर प्लेमध्ये चांगला वापर करून घेतला. सँटनरने कर्णधार ॲरॉन फिंचला १३, तर टीम साऊदीने शॉन मार्शला १६ धावांवर बाद करीत 'कांगारूं'ची टॉप ऑर्डर पॅव्हेलियनमध्ये धाडली. यानंतर मॅक्सवेलने २० चेंडूंत २८ धावा करून परतला.

ऑस्ट्रेलियाचे चार फलंदाज ५० धावांतच गारद झाल्यानंतर मधली फळी थोडा प्रतिकार करेल असे वाटले होते, मात्र न्यूझीलंडच्या गोलंदाजांनी प्रभावी मारा चालूच ठेवला. टीम डेव्हिड ११, तर मॅथ्यू वेड दोन धावांची भर घालून परतला. मार्कस स्टॉयनिसही चमक दाखवू शकला नाही. मिचेल सँटनरच्या गोलंदाजीवर मोठा फटका मारण्याच्या प्रयत्नात तो सात धावा करून बाद झाला. ग्लेन फिलिप्सने स्टॉनिसचा हवेत डाईव्ह मारत जबदस्त झेल पकडला.

तत्पूर्वी सलामीवीर डेवॉन कॉनवॉयच्या नाबाद ९२ धावांच्या खेळीच्या जोरावर न्यूझीलंडने २० षटकांत ३ बाद २०० धावा केल्या होत्या. त्याला साथ देणाऱ्या जेमी नीशमने १३ चेंडूंत २६ धावा केल्या. त्याने हेजलवूडला शेवटच्या चेंडूवर षटकार मारत न्यूझीलंडला २०० धावांपर्यंत पोहचवले, तर सलामीवीर फिन एलनने १६ चेंडूंत ४२ धावा चोपल्या. ऑस्ट्रेलियाकडून जोश हेजलवूडने दोन, तर ॲडम झम्पाने एक गडी बाद केला.

प्रो कबड्डी लीग

# यु मुंबा, पुणेरी पलटणची विजयी घोडदौड कायम

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

प्रो कबड्डी लीगच्या नवव्या हंगामात यु मुंबाने शेवटच्या क्षणी बाजी पलटवित हरियाणा स्टीलर्सला ३२-३१ असे पराभूत केले, तर दुसऱ्या सामन्यात पुणेरी पलटणने विजयी घोडदौड कायम ठेवत बंगालला २७-२५ असे पराभूत करीत गुणतालिकेत थेट तिसऱ्या स्थानी झेप घेतली.

बंगाल वॉरियर्सने पहिल्या पूर्वार्धात १५-११ अशी आघाडी घेतली. बंगालचा कर्णधार मनिंदर सिंग याने सामन्याची चांगली सुरुवात केली आणि लगेचच जबरदस्त सुपर राइडचा करीत चार गुणांची आघाडी घेतली. त्याने दोन जणांना बाद करीत ती रेड गाजवली, मात्र पुणेरी पलटणने शानदार पुनरागमन करीत बंगालवर दडपण आणले. पुण्याकडून मोहित गोयतने सर्वाधिक चार गडी बाद करीत गुणांमधील अंतर कमी केले. दुसऱ्या हाफची सुरुवात अतिशय संथ झाली. पुण्याने योग्य वेळ साधत बंगालला ऑलआऊट केले. मनिंदर सिंगला बाद करीत फजल अत्राचलीने मोसमातील पहिला हाय ५ पूर्ण केला.

यु मुंबाने या सामन्यात संथ सुरुवात केली. आक्रमक सुरुवात करणारा हरियाणा स्टीलर्स पहिल्या हाफच्या अखेरीस आघाडीवर होता, मात्र, मुंबईने त्यानंतर अचानक वेग पकडला. गुमान सिंग याने रेडींगची जबाबदारी घेतली. सुरेंदर सिंगने कर्णधाराला साजेसा खेळ करीत बचावात सहा गुणांची कमाई केली. हरेंदर व जय भगवान यांनी त्याला सुरेख साथ दिली. अखेरच्या रेडआधी बरोबरीत असलेल्या या सामन्यात मुंबईने सरतेशेवटी ३२-३१ अशा विजयाची नोंद केली.

# शाहीन आफ्रिदीचा सामना करण्यासाठी रोहितने केला सराव



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघाचा कर्णधार रोहित शर्मा पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यासाठी सज्ज झाला आहे. त्याने नेटमध्ये चांगलाच घाम गाळला. त्याने पाकिस्तानचा डावखुरा वेगवान गोलंदाज शाहीन शाह आफ्रिदीला सामोरे जाण्याची तयारी केली आहे.

रोहित शर्माबद्दल असे म्हटले जाते की या खेळाडूकडे इतर फलंदाजांपेक्षा चेंडू खेळण्यासाठी जास्त वेळ असतो. या भारतीय कर्णधाराने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये आतापर्यंत ४१ शतके झळकाविली आहेत. त्यात एकदिवसीय प्रकारातील सर्वाधिक ३३ शतकांचा समावेश आहे.

भारताविरुद्धच्या सामन्यापूर्वी रोहितने शाहीनचा वेग आणि स्विंगचा सामना करण्यासाठी नेटमध्ये अतिरिक्त सराव केला. रोहितने शाहीनविरुद्ध कोणतेही चुकीचे शॉट्स खेळू नयेत यासाठी सर्व प्रकारच्या फटक्यांचा सराव केला.

भारत आणि पाकिस्तान सामन्यापूर्वी भारतीय कर्णधार रोहित शर्माचा एक फोटो सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. वास्तविक, या फोटोमध्ये रोहित नेटवर फलंदाजीचा सराव करत आहे. नेटमध्ये तो पाकिस्तानी वेगवान गोलंदाज शाहीन आफ्रिदीच्या चेंडूंचा सामना कसा करायचा याची तयारी करीत आहे. यादरम्यान रोहित नेटमध्ये आडवा शॉट मारण्याऐवजी सरळ बॅटने खेळण्याचा प्रयत्न करीत आहे. त्यामुळे पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यात आफ्रिदीला चांगल्या प्रकारे तोंड देता येईल.

भारतीय कर्णधाराने दिनेश कार्तिकसोबत सुमारे दीड तास फलंदाजीचा सराव केला. सरावानंतर रोहितने कार्तिक आणि अक्षर पटेल यांना फलंदाजी करताना पाहिले. दरम्यान, तो मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविडशी बोलत राहिला. थोड्या विश्रांतीनंतर, रोहित नेट्समध्ये परतला आणि त्याने श्रीलंकेच्या डाव्या हाताच्या थ्रोडाउन स्पेशालिस्ट नुवान सेनेविरत्नेच्या गोलंदाजीचा सामना केला.

# राष्ट्रीय स्पर्धेत जिंकलेली ट्रॉफी शिवरायांचरणी

## पदक विजेत्या खेळाडूंचा किल्ले रायगडावर मानाचा मुजरा

**अलिबाग, महाड : प्रतिनिधी**

जिद्द, आत्मविश्वास आणि प्रचंड मेहनतीच्या बळावर ३६व्या राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्रातील गुणवंत युवा खेळाडूंनी दमदार यश संपादन केले. १४० पदकांची कमाई करीत महाराष्ट्र संघ उपविजेतेपदाचा मानकरी ठरला. मिळालेली बहुमानाची ट्रॉफी घेऊन महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेने धनत्रयोदशीच्या दिवशी रायगड किल्ल्यावर शिवरायांना मानाचा मुजरा केला.


ऑलम्पिक संघटनेने हा आगळावेगळा उपक्रम राबवला. या वेळी महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेचे सहसचिव नामदेव शिरगावकर, पथक प्रमुख प्रदीप गंधे, निलेश जगताप, अमित गायकवाड, राजेंद्र घुले, शिवाजी साळुंखे, संदीप वांदळे, रायगड क्रीडा अधिकारी वनमाने, कुस्ती मार्गदर्शक शिवाजी कोळी आणि पदक विजेते खेळाडू उपस्थित होते. युवा खेळाडूंच्या सोनेरी आणि चंदेरी यशाच्या या ट्रॉफीने किल्ले रायगडचा परिसर उजळून निघाला.



# नवी मुंबई व रायगड जिल्हा अजिंक्यपद टेबल टेनिस स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई स्पोर्ट्स व सामाजिक विकास मंडळ आणि रायगड जिल्हा टेबल टेबल टेनिस असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने नवी मुंबई व रायगड जिल्हा अजिंक्यपद टेबल टेनिस स्पर्धेचे आयोजन २९ व ३० ऑक्टोबर रोजी करण्यात आले आहे. ही स्पर्धा नवीन पनवेल सेक्टर १८ येथील




सिडको समाजमंदिरात होणार आहे.

स्पर्धेचे उद्घाटन शिव छत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार विजेते रायगड जिल्हा टेबल टेनिस असोसिएशनचे अध्यक्ष संजय सुदाम कडू यांच्या हस्ते २९ ऑक्टोबरला सकाळी ९.३० वाजता होणार आहे. स्पर्धा नवोदित मुली व मुले, ११, १३, १५, १७, १९ वर्षाखालील मुली व मुले, महिला व पुरुष एकेरी आणि ज्येष्ठ पुरुष अशा विविध गटांत घेण्यात येणार आहे.

स्पर्धेत चीफ रेफ्री म्हणून डी. आर. साळसकर, असिस्टंट चीफ रेफ्री पराग अंकोलेकर काम पहाणार आहेत. या स्पर्धेतील विजयी खेळाडूंची महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद टेबल टेनिस स्पर्धेसाठी निवड केली जाणार आहे.

# एकता बिश्तने हॅट्ट्रिकसह घेतल्या सात विकेट्स



## सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी स्पर्धेत कमाल

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

टी-२० क्रिकेटमध्ये गोलंदाजांची धुलाई होणे ही सामान्य गोष्ट आहे, मात्र प्रत्येक सामन्यात किमान एक-दोन गोलंदाज असे असतात जे दमदार गोलंदाजी करतात आणि आपल्या संघासाठी झकास कामगिरी करतात. काही वेळा तर गोलंदाज संपूर्ण सामन्यालाच कलाटणी देतो. असेच काहीसे चित्र एका सामन्यात पहावयास मिळाले. भारताची दमदार फिरकीपटू एकता बिश्त हिने अप्रतिम कामगिरी करून दाखवली. एकीकडे सध्या भारतात सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीचे आयोजन केले जात आहे, तर महिला वरिष्ठ टी-२० चॅम्पियनशिपही खेळवली जात आहे. या स्पर्धेत एकताने चार षटकांत सात गडी घेण्याचा विक्रम केला.

| | |
|---|---|
| ०४ | षटके |
| ०८ | धावा |
| १९ | चेंडू निर्धाव |
| ०७ | विकेट्स |

उत्तराखंडकडून खेळताना डावखुरी फिरकीपटू एकता हिने सात गडी तर बाद केलेच, पण त्यात तिने जास्त धावादेखील दिल्या नाहीत. तिच्या गोलंदाजीवर तिचे पूर्ण नियंत्रण होते. तिने टाकलेल्या २४ चेंडूंत (चार षटके) तिने झारखंडचे सात फलंदाज बाद केले, पण महत्त्वाचे म्हणजे तिने केवळ आठ धावाच दिल्या. तिच्या २४ चेंडूंपैकी १९ चेंडू निर्धाव होते. एकताने सात विकेट्स घेतल्या. त्यात तिने एक हॅट्ट्रिकदेखील घेतली. डावाच्या १९व्या षटकात एकताने चौथ्या, पाचव्या आणि सहाव्या चेंडूवर शुभ, देवयानी आणि प्राजक्ता यांची विकेट घेतली. या षटकांत तिने एकूण चार विकेट घेतल्या.

एकता बिश्तच्या या अप्रतिम स्पेलच्या जोरावर उत्तराखंडने अवघ्या १०७ धावांनी सामना जिंकला. झारखंडचा संपूर्ण संघ १९.३ षटकांत केवळ ९७ धावांत गारद झाला आणि उत्तराखंडने १० धावांनी सामन्यात विजय मिळवला. एकताने सर्वात आधी रुमाला १५ धावांवर बाद करून मग पाटील आणि मोनिका दोघींना एकाच षटकात माघारी पाठवले. त्यानंतर तिच्या अंतिम षटकात तिने चार विकेट घेतल्या. त्यात हॅट्ट्रिकचा समावेश होता. शेवटच्या षटकातील दुसऱ्या चेंडूवर एकताने निहारिका माघारी पाठवले व त्यानंतर हॅट्ट्रिक घेत सामन्यात मोलाची भूमिका बजावली.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com